संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २५५ * * अकोला * | मंगळवार, दिनांक ११ मार्च २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

M.: 7620828933, 8668649460
New NAF
ALISHAN FURNITURE
ALL FURNITURE MANUFACTURER & WHOLESALE & RETAIL
Besa Chowk, Opposite Vyanketesh City, Ghogli Road, Nagpur

अग्रलेख

## खरीखरी..

## शिस्तीचा अर्थसंकल्प

आज ठरल्याप्रमाणे महाराष्ट्राचा अर्थसंकल्प शिस्तीने सादर झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती पाहता ज्या ज्या ठिकाणी कपात करणे शक्य होते. त्या त्या ठिकाणी अर्थमंत्र्यांनी ती कपात केलेली आहे. निवडणुकीपूर्वी जी जी आश्वासने दिलेली होती. ती बंद केलेली नाहीत. मात्र मागच्या मुख्यमंत्र्यांनी लाडक्या बहिणींना पंधराशे रुपयांच्या ऐवजी 2100 रुपये करण्याची करण्याची केलेली घोषणा अंमलात येण्यास या अर्थसंकल्पात तरी मुहूर्त सापडलेला नाही. महाराष्ट्र हे देशातील सर्वात श्रीमंत राज्य आहे असे म्हणतात. तसे पाहिले तर अमेरिका जगातील सर्वात श्रीमंत देश आहे. पण त्या देशातही ट्रम्प नावाचा एक्का आल्याबरोबर त्यांनीही कापाकापी सुरू केलेली आहे. आपल्या महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी तसे काही केलेले नाही. हे आपले भाग्यच म्हणावयास हवे. या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी अर्थाअर्थी जेवढी आर्थिक बेरीज-वजाबाकी करायची आहे तेवढी केलेली आहे. निवडणुकीच्या आधीचा अर्थ आणि त्याचा संकल्प तेव्हा गरजेचा होता. आता गरज संपलेली आहे. विजयमाला गळ्यात पडलेली आहे. त्यामुळे पुढील साडेचार वर्ष तरी विभिन्न कारणे दाखवून महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी थोडा थोडा त्याग करायला हवा. असे आवाहन अर्थमंत्र्यांनी केले. तर त्याला प्रतिसाद देणे मराठी महाराष्ट्राचे आणि विशेष करून मराठी मुंबईचे कर्तव्यच आहे. तो केला पाहिजे. पण अर्थमंत्र्यांनी बऱ्याच सकारात्मक गोष्टी अर्थसंकल्पामध्ये केलेल्या आहेत. त्यामध्ये मुंबईची वाहतूक गतिमान करणे. ही कितीतरी मोठी गोष्ट आहे. आता याच गतिमानतेची प्रगती लवकरच आपल्याला दिसेल आणि मुंबईची वाहतूक वेगवान होईल. अशी अपेक्षा मुंबईकरांनी ठेवलेली असेल. तर ती नक्कीच पूर्ण होईल असे समजूया. मुंबईप्रमाणेच पुणे म्हणा, नागपूर म्हणा किंवा इतरही काही शहरे म्हणा. त्यांचीही तीच समस्या आहे. त्यांच्यासाठीही पुढील अर्थसंकल्पात अर्थमंत्री नक्कीच काहीतरी भरीव करतील. असा विश्वास बाळगायला अजिबात हरकत नाही. शेतक?यांची कर्जमाफी केलेली नाही, मात्र ती करणार नाही. असे अर्थमंत्री बोलले नाहीत, म्हणजे पुढे केव्हा तरी ती होईलच. याबद्दल आपल्या सर्व शेतकरी बांधवांनी निश्चित राहावे. आता आपण शिवशाही बद्दल बोलूया. (शिवशाही म्हणजे शिवशाही बसबद्दल नाही बरे!) छत्रपती शिवरायांच्या काळात ज्या आग्र्यात शिवाजी महाराज औरंग्याच्या कैदेत असताना आणि सुटकेची अजिबात शक्यता नसताना आपला गनिमी कावा दाखवून त्याच्या हातावर तुरी दिल्या आणि त्याला स्वतःचे डोके फोडायला भाग पाडले. त्या आग्र्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहणार आहे. त्याचाच बदला घेताना त्यानंतरच्या काळात शंभूराजांना संगमेश्वरात घरभेद्यांकरवी घात झाल्याने ते औरंग्याच्या ताब्यात गेल्यावर शंभूराजे ज्या निर्भयपणे अत्याचारांना सामोरे गेले. त्या निर्भयपणाचे स्मारक उभारण्याचे ठरवणे ही अत्यंत प्रेरणादायी गोष्ट आहे. पानिपत ही आता म्हण झालेली आहे. एखाद्याचे फार मोठे नुकसान झाल्यावर पानिपत झाले असे म्हणतात. पण पानिपत ही मराठ्यांची शौर्यगाथा आहे. हे आता जवळजवळ सर्वच इतिहासकार मान्य करतात. पराभव झाला तरी मराठी सत्ता जराही हलली नाही, जराही डुलली नाही. हा महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास आहे. मराठे आणि अब्दाली यांच्यात जोरदार युद्ध झालेल्या त्या पानिपत येथील भूमीवर शौर्याचे प्रतीक म्हणून स्मारक उभारण्याची घोषणा समस्त मराठी जनांना सुखावणारी आहे. याशिवाय अभय योजनेमुळे कर सवलतीचा एक महत्त्वाचा निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आलेला आहे. त्यामुळे राज्यातील कर विभागाच्या विविध कायद्यानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेल्या थकबाकीच्या तडजोडी करता अभय योजना जाहीर करण्यात आलेली आहे. औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी मेक इन महाराष्ट्र द्वारे गुंतवणुकीस चालना दिलेली आहे. तसेच पुढील पाच वर्षात 40 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि 50 लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. मुंबई महानगर प्रदेशचे आर्थिक उत्पादन 2047 पर्यंत 1.5 ट्रिलियन डॉलर करण्याचा संकल्प या निमित्ताने करण्यात आलेला आहे. कृषी व सिंचनासाठी विविध योजना द्वारे अनुदान देण्याची घोषणाही करण्यात आलेली आहे. तसेच महिला सक्षमीकरणासाठी उद्योजकता आणि बचत गटांना आर्थिक सहाय्य आणि मुलींच्या शैक्षणिक सहभागासाठी परीक्षा शुल्कात शंभर टक्के प्रतिपूर्ती करण्याची घोषणाही करण्यात आलेली आहे. ग्रामीण घरकुल योजना आणि शहरी गृहनिर्माणासाठी अनुक्रमे 15000 कोटी आणि 8100 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. पायाभूत सुविधां करिताही पुरेसा निधी घोषित करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीला पाच किलोमीटरच्या परिघात दजेर्दार आरोग्य सुविधा पुरवण्याकडेही सरकारचे लक्ष असणार आहे. तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळांचा विकास, जल पर्यटन आणि साहसी पर्यटनाला चालना देण्यासाठी, प्रकल्प निर्मितीचेही धोरण सरकार राबवणार आहे. तसेच खेळाडू तयार व्हावेत. यासाठी पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलासाठी भरीव निधीची तरतूदही करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सर्वच बाबतीत शिस्तशीरपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राला यापुढे शिस्तीत राहावे लागेल. हा सल्लाही दिलेला आहे. 'मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले' असे म्हणतात. मुंबई ही आपली आर्थिक राजधानी आहे, असे आपण नेहमीच म्हणतो. तेव्हा आता मुंबईला आर्थिक उंचीवर नेण्यासाठी महाराष्ट्राला प्रयत्न करावे लागतील. त्यामुळे जशी वाहतूक गतिमान होईल. तशीच आर्थिक प्रगतीही गतिमान होईल असा आत्मविश्वास बाळगायला अजिबात हरकत नाही. विशेष म्हणजे आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पाचे समतोल साधणारा अर्थसंकल्प, असे कौतुक करून अर्थसंकल्पात संतुलन ठेवणे देखील महत्त्वाचे असते. असेच नमूद केलेले आहे. बड्या घराला सावरताना घरातील खाचखळगे सर्वात प्रथम बुजवावे लागतात. त्याप्रमाणे अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राचा गाडा चालवण्यासाठी जी जी पावली उचललेली आहेत. त्याकडे आपण जरा सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे.

[signature]
nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राज्याचा अर्थसंकल्प विधीमंडळात सादर

# घोषणांचा अक्षरशः पाऊस

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** राज्याचा अर्थसंकल्प आज विधीमंडळात सादर करण्यात आला. राज्यातील नवीन सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प असून या अर्थसंकल्पात देखील अनेक घोषणांचा अक्षरशः पाऊस पाडण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला.





*वित्त व नियोजनमंत्री अजित पवार अर्थसंकल्प सादर करताना. तत्पूर्वी त्यांनी विधीमंडळ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले. यावेळी वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल आणि आमदार उपस्थित होते.*

महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही... असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, विकसित भारत- विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.

अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले.

शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे ३५० वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे.

जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६४ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे.

वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल.

**अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये :**

१. राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

२. आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खचार्तील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे.

मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरिडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.

३. विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरता मेक इन महाराष्ट्रद्ध व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.

४. कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक 3.3% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२५-२६ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्य वर्धन, सिंचन सुविधा, विजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.

५. केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.

६. वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.

७. महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

८. राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.

९. दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.

▶▶ पान ८ वर

## १० हजार वर्षातील सर्वात बोगस बजेट...

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारने सादर केलेला आजचा अर्थसंकल्प मागील १० हजार वर्षातील सर्वात बोगस असल्याची टीका केली आहे. आजचा अर्थसंकल्प पाहून मला आचार्य अत्रे यांची आठवण झाली. आज ते असते तर असा बोगस अर्थसंकल्प मी मागच्या १० हजार वर्षात पाहिला नाही असे ते म्हणाले असते. उद्याचा सूर्य उगवेल, सर्वांना प्रकाश मिळेल व त्यातून व्हिटॅमिन बी सुद्धा मिळेल अशा आशयाचे हे बजेटचे आहे. 'मारल्या होत्या थापा भारी आणि महाराष्ट्र केलाय कर्जबाजारी', असे ते म्हणालेत.

उद्धव ठाकरे पत्रकार परिषदेत म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या काळात ज्या गोष्टी त्यांनी यात सांगितल्या आणि मते मिळवली. या सरकारला प्रचंड बहुमत मिळाले आहे. त्यांनी मतदारांना ज्या १० थापा मारल्या होत्या. त्यातील एकही गोष्ट सरकारने पूर्ण केली नाही.

महायुती सरकारने लाडक्या बहिणींना २१०० रुपये



देण्याची हमी दिली होती. पण त्यावर या बजेटमध्ये काहीही नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या आश्वासनावरहीही यात काही नाही. माझ्या नेतृत्वातील सरकारने नागपूर येथे शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम जारी केला होता. त्या धर्तीवर मी मुख्यमंत्र्यांना या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे आव्हान दिले होते. आजच्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेसाठी काहीही नाही. पण कंत्राटदारांसाठी खूपकाही आहे, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी

▶▶ पान ८ वर

## एमपीत टँकर व जीपची धडक

## ८ ठार, १३ जखमी

■ **वृत्तसंस्था, सिधी, दि. १० :** मध्य प्रदेशातील सीधी येथे टँकर आणि जीपच्या धडकेत ८ जणांचा मृत्यू झाला. जखमी झालेल्या १३ जणांपैकी ७ जणांची प्रकृती गंभीर आहे.

कोतवाली पोलीस स्टेशन परिसरात हा अपघात झाला. मृतांमध्ये पाच महिला आणि तीन पुरुषांचा समावेश आहे. जखमींमध्ये ६ मुलेही आहेत. गंभीर जखमींना रेवा मेडिकल हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले आहे, तर उर्वरित जखमींना सिधी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

राजमणी साहू त्यांच्या मुलीचा 'मुंडण संस्कार' करण्यासाठी मैहरच्या झोखो येथे जात होते. त्याच्या कुटुंबासोबत, त्याच्या सासरच्या मंडळींचेही लोक तिथे होते. टँकर सिधीहून बहरीकडे जात होता. पहाटे २.३० वाजताच्या सुमारास उपणी पेट्रोल पंपाजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर टक्कर झाली. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

## लोकाभिमुख अर्थसंकल्प : मुख्यमंत्री फडणवीस



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** राज्याच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास यांचा समतोल साधणारी पंचसूत्री मांडण्यात आली आहे. विकसित भारतासोबत विकसित महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेला हा लोकाभिमुख अर्थसंकल्प आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

विधानसभेत उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. राज्याच्या अर्थसंकल्पाचे आकारमान आता सात लाख कोटींवर पोहोचले आहे. राज्याच्या जीएसडीपी (सकल राज्य उत्पादन) वाढीचा दर ७.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे, जो मागील दहा वर्षांत पाच ते दहा लाख कोटींनी वाढला आहे. यामुळे राज्याची कर्ज घेण्याची क्षमता वाढली असली तरी ठरवलेल्या मर्यादितच अर्थव्यवस्था टिकवल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्राचे स्टार्टअप क्षेत्र देशात क्रमांक एकवर आहे. जीएसटी संकलनामध्येही राज्य आघाडीवर असून, राष्ट्रीय कर संकलनामध्ये महाराष्ट्राचे योगदान सात टक्क्यांपेक्षा जास्त आहे. राज्यातील रस्ते विकासासाठी २० वर्षांच्या दृष्टीकोनातून नियोजन करण्यात आले आहे. यासाठी वर्ल्ड बँक, एशियन बँक, न्यू डेव्हलपमेंट बँक आणि नाबार्डच्या मदतीने मोठ्या प्रमाणात निधी उभारला जाणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २० लाख घरे बांधण्याचे उद्दीष्ट पूर्ण होत आहे. विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलतानाच रोजगारनिर्मितीवर भर दिला जाणारा हा अर्थसंकल्प असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## चॅम्पियन बजेट : उपमुख्यमंत्री शिंदे



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मांडण्यात आलेल्या राज्य अर्थसंकल्पाला चॅम्पियन बजेट असे संबोधले आहे. लोकाभिमुख योजना आणि पायाभूत सुविधांचा समतोल राखत, सर्व घटकांना न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे, असे त्यांनी म्हटले.

शिंदे म्हणाले, गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्राच्या विकासाची घोडदौड सुरू असून, हा प्रवास थांबणार नाही, असा निर्धार अर्थसंकल्पातून व्यक्त झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रस्ते, पूल, बंदरे आणि औद्योगिक विकासासाठी मोठ्या तरतुदी केल्या आहेत, त्यामुळे महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी आघाडीवर राहील. मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्राची दीड ट्रिलियन डॉलर्स योगदान क्षमता असून, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतूसारखे महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, लाडकी बहीण योजनेबाबत विरोधकांनी अपप्रचार केल्याचे सांगत, या योजनेसाठी अर्थसंकल्पात ३६,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. गरिब, दुर्बल महिलांना केवळ आर्थिक मदत नाही, तर त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठीही तरतुदी केल्या आहेत, असे ते म्हणाले.

## तनिष्क शोरूममधून लुटले २५ कोटींचे दागिने

■ **वृत्तसंस्था, आरा (भोजपूर), दि. १० :** सोमवारी, बिहारमधील आरा येथील गोपाली चौक येथील तनिष्क शोरूममधून सहा दरोडेखोरांनी २५ कोटी रुपयांचे दागिने लुटले. गुन्हेगारांचा पाठलाग करणाऱ्या पोलिसांनी गोळीबार केला. दोन गुन्हेगारांच्या पायात गोळ्या लागल्या. पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांच्याकडून काही दागिने जप्त करण्यात आले.

४ दरोडेखोरांनी लुटलेले दागिने घेऊन पळ काढला. शोरूमचे स्टोअर मॅनेजर कुमार मृत्युंजय म्हणाले, 'शोरूममध्ये ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे दागिने होते. गुन्हेगारांनी २५ कोटी रुपयांचे दागिने लुटले आहेत. सोमवारी सकाळी १०:३० वाजता, ३ बाईकवरून आलेल्या ६ गुंडांनी शोरूमबाहेर उभ्या असलेल्या गार्डवर हल्ला केला आणि त्याचे शस्त्रही हिसकावून घेतले. शोरूममध्ये प्रवेश करताच

▶▶ पान ८ वर

## विरोधकांचे पायऱ्यांवर आंदोलन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** निवडणुकी आधी शेतकरी, लाडक्या बहिणी यांना आश्वासन देऊन सत्तेत आलेलं महायुती सरकार आता मात्र यांना विसरले असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे, गुलाबी जॅकेट वाल्यांचा धिक्कार असो, रंग बदलणाऱ्या सरकारांचा धिक्कार असो अशा घोषणा विरोधकांनी पायऱ्यांवर दिल्या.

**गुलाबी जॅकेटवाले विसरले...**

ज्यांच्या मतांवर महायुती सरकार सत्तेत आले त्याच लाडक्या बहिणी, शेतकरी, वंचित, आदिवासी यांचा महायुतीने विश्वासघात केला. निवडणुकी आधी गुलाबी जॅकेट घालून फिरणारे आता गुलाबी जॅकेट ही विसरले आणि लाडक्या बहिणींना विसरले अशी टीका काँग्रेस विधी मंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडला. पण या बजेट मध्ये लाडक्या

▶▶ पान ८ वर

**विश्वासघात करणारा अर्थसंकल्प**
**हर्षवर्धन सपकाळ**

राज्य सरकारने आज सादर केलेला अर्थसंकल्प शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाला तडा देणारा असून कोणतीही दिशा, ध्येय किंवा ठोस धोरण नसलेला पोकळ अर्थसंकल्प आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या अर्थसंकल्पातून

▶▶ पान ८ वर

## लाडक्या बहिणींनो... २१०० रुपये विसरा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :** लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये हप्ता देण्याचे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी दिले होते. इंदाच्या अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा होते का? याकडे राज्यातील महिलांचे लक्ष लागून होते.

मात्र,अजित पवार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा सन्माननिधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा केली नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींना आता २१०० रुपयांसाठी किमान वर्षभर वाट पाहावी लागणार आहे.

आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करू, लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै, डिसेंबर महिना आहे, आवश्यक तेवढी तरतूद आपण यामध्ये ठेवल्याचे सीएम फडणवीस म्हणाले.

## महापालिकेत अर्थसंकल्पाची तयारी सुरु

**अकोला** : महापालिकेचा २०२५- २०२६ चे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू झाले आहे.अर्थसंकल्प या महिन्याच्या अखेरीस मंजूर होण्याची शक्यता आहे. आर्थिक वर्ष संपणार असल्याने २०२५ २०२६ चे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू होते. आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनीही यासंदर्भात दोन बैठका घेतल्या. महापालिकेत कार्यकारिणी नसल्याने आयुक्त व प्रशासक यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाला मंजुरी द्यावी लागणार आहे. अंमलबजावणी न झाल्यामुळे अर्थसंकल्पात कर वाढण्याची शक्यता फारच कमी आहे. मागील अंदाजपत्रकात केवळ काही सुविधांसाठी केलेल्या तरतुदी यामध्ये पुन्हा झाल्या आहेत का? ही बाब येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल ३१ मार्चपूर्वी प्रशासकांनी अर्थसंकल्प मंजूर केल्यास १ एप्रिलपासून नवीन अर्थसंकल्प लागू होईल. महापालिकेत कार्यकारिणी असताना प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्वप्रथम स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा होते. स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर सर्वसाधारण सभेत चर्चा केली जाते. महापालिकेला २०२४-२५ मध्ये १००९.४३ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित होते, मात्र कर संकलनात मोठी घट झाली आहे.

# अकोल्यातील कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थ्यांची आत्महत्या; सखोल चौकशीची मागणी

### ▪विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचे ओझे आणि मानसिक तणाव चिंतेचा विषय
### ▪खोलीत एकटाच असताना उचलले टोकाचे पाऊल

**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** स्थानिक जवाहर नगर परिसरातील एका नामांकित कोचिंग क्लासेसमध्ये नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या१९ वर्षीय प्रथमेश उमेश भारब्दे या विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी दुपारी घडली. अंजनगाव सूर्जी येथील रहिवासी असलेल्या प्रथमेशवर अंत्यसंस्कार शनिवारी शोकाकुल वातावरणात पार पडले; मात्र त्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही.

यांप्रकरणी पोलिसांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी पालकवर्ग आणि नागरिकांकडून होत आहे. प्रथमेश हा मूळचा अंजनगाव सूर्जी येथील रहिवासी असून, गेल्या काही वर्षांपासून अकोल्यात. वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करत होता.

**खोलीत एकटाच असताना उचलले टोकाचे पाऊल**

डॉ. सोनोने हॉस्पिटलजवळील एका भाड्याच्या रूममध्ये आपल्या रूम पार्टनरसह राहत होता. शुक्रवारी रूम पार्टनर बाहेर गेलेला असताना प्रथमेशने गळफास लावून आत्महत्याप केली. त्याचा रूम पार्टनर घरी परतल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

मागील वर्षी परीक्षेत अपयश आल्याने यंदा नव्याने तयारी करण्यासाठी त्याने जवाहर नगर परिसरातील एका कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेतला होता.

घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असली, तरी आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचे ओझे आणि मानसिक तणाव चिंतेचा विषय शैक्षणिक क्षेत्रात वाढत्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड तणाव असतो. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी परीक्षांच्या तयारीदरम्यान विद्यार्थ्यांवर मोठ्या अपेक्षांचे ओझे असते. अभ्यासाच्या दबावामुळे होणाऱ्या मानसिक तणावाचा परिणाम त्यांच्यावर होत असल्याने अशा घटनांना आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, असे मत अनेक शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

**कुटुंबीयांमध्ये हताशा**

एकुलता एक मुलगा गमावल्यामुळे भारब्दे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. कोचिंग क्लासेसमधील दडपण, मानसिक तणाव किंवा अन्य कोणते कारण यामागे आहे का? याबाबत पालकवर्गामध्ये चिंता व्यक्त होत आहे. त्यामुळे या घटनेच्या सखोल चौकशीची मागणी नागरिक आणि पालकांकडून केली जात आहे.

## कालबाह्य वाईट रुढी परंपरांना तिलांजली देऊन एकल महिलांनी प्रगती करणे काळाची गरज!

### जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचे प्रतिपादन




**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** एकल महिला सन्मान चळवळ अंतर्गत एकल महिला परिषद व परिचय मेळावा महिला व बाल विकास विभाग अकोला, माणस फाऊंडेशन,सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला,एन्करेज एज्युकेशनल फाऊंडेशन अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त एकल महिला परिषद व परिचय मेळावा जानोरकर मंगल कार्यालय, कौलखेड अकोला येथे संपन्न झालेल्या या मेळाव्याला उद्घाटनिय मार्गदर्शन करताना जुन्या वाईट चालीरीती रूढी परंपरा अंधश्रद्धा यांना तीलाजली देऊन एकल महिलांनी आपला सर्वांगीण विकास करून घेण्याची गरज आहे.

कोणत्याही वाईट प्रसंगाला न घाबरता शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेऊन आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा त्यासाठी शासन आपल्या नेहमी पाठीशी राहील असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले.या मेळाव्यात जिल्ह्यातील एकल महिला त्यांचे प्रश्न समस्या विवंचना, सक्षमीकरण, शासन योजना, पुनर्वसन आदी विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शक केले.

## मराठी उद्योजकांनी निर्यात क्षेत्रातील संधीचा फायदा वेळीच घ्यावा : डॉ.धनंजय दातार



**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** भारताची निर्यात गेल्या दशकभरात विक्रमी वाढून ऐतिहासिक उच्चांकी पातळीला पोचली आहे आणि पुढील दशकातही हा वेग टिकून राहण्याची चिन्हे आहेत. भारतात व विशेषतः महाराष्ट्रात निमित्त अनुकूल अशा महत्त्वाच्या घडामोडी घडत असून त्या संधींचा फायदा मराठी व्यावसायिक व उद्योजकांनी वेळीच घ्यावा, असे आवाहन दुबईस्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नुकतेच येथे केले.

मिती ग्रुप'तर्फे आयोजित 'महाराष्ट्र बिझनेस एन्क्लेव्ह २०२५' परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या यशस्वी उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. माटुंग्यातील 'वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मध्ये झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील नामवंत तसेच नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवी मुंबई येथे नवा आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारत आहे. नुकताच जाहीर झालेला वाढवण बंदर व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्राला जागतिक निर्यातीत अग्रेसर बनवणार आहे.

# राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात बोगस अर्थसंकल्प!

### ▪महायुतीच्या जाहीरनाम्यातील एकही गोष्ट अर्थसंकल्पात नाही !
### ▪हा सामान्य शेतकऱ्यांसाठी नव्हे तर पंचारांकीत उद्योगपतींसाठीचा अर्थसंकल्प!
### ▪महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रवक्ते कपिल ढोके ह्यांची अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया



**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** राज्याचे अर्थमंत्री अजित पवारांनी मांडलेला अर्थसंकल्प हा राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात बोगस व निरर्थक अर्थसंकल्प आहे.

महायुती ने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात केलेल्या घोषणांपैकी एकही घोषणा पुर्ण केलेली नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची घोषणा नाही सोबतंच किसान सन्मान निधी ३ हजार रु करणार होते त्या संबंधी सुद्धा कुठलीही तरतुद नाही.

अर्थसंकल्पातील हजारे कोटींचे आकडे हे सामान्य शेतकऱ्यांसाठी नाहीत. तर पंचारांकीत व्यवस्थेतराहणाऱ्याउद्योगपतींसाठीच आहेत. निवडणुकीच्या वेळी गुलाबी जॅकेट घालुन फिरणाऱ्या अजित दादांनी महायुती च्या जाहीरनाम्यात लाडक्या बहीनींचा हप्ता १५०० वरुन २१०० रु करण्याचे आश्वासन दिले होते. त्याची सुद्धा घोषणा आजच्या अर्थसंकल्पात नाही.

एकंदरीत आजचा अर्थसंकल्प हा आतापर्यंतचा सर्वात फसवा व बोगस अर्थसंकल्प आहे. कपिल धनराज ढोके प्रवक्ता,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी महासचिव महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात

### गोरक्षकांकडून गायीची सुटका,आरोपी ताब्यात



**अकोला** : जिल्ह्यातील बार्शीटाकळी रोडवर अवैधरित्या कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गायीची सुटका करण्यात आली. जय सेवालाल गौरक्षण संस्थेचे सौरव राठोड यांनी गोरक्षण करताना एक चारचाकी वाहन अडवले. संशयित वाहनातील चालकाने उडवा-उडवीची उत्तरे दिल्यानंतर गायीला कत्तलीसाठी नेले जात असल्याची खात्री झाली. गोरक्षकांनी वाहन अडवून चालकाला चांगलाच चोप देत गायीला मुक्त केले व आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

### ग्रामीण भागात पाणी समस्या उग्र

**अकोला :** ग्रामीण भागातील पाणी प्रश्न आतापासूनच उग्र होत चालला आहे. त्याकडे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे अट पूर्ण प्रकल्प मध्ये सध्या समाधानकारक पाणी असूनही लोकांना पाहण्यासाठी म्हणून भटकण्याची वेळ आलेली आहे नियोजनाचा अभाव हा त्यामागील मुख्य कारण असल्याचे ग्रामवासी बोलत आहेत याबाबत ग्रामवासी तक्रारी करतात परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही असा आरोप देखील करण्यात येत आहे ही समस्या लक्षात घेऊन तातडीने मार्ग काढण्यात यावा.

## 'आरोग्य यंत्रणा आपल्या दारी'अभियानांतर्गत दर रविवारी आरोग्य शिबिर



**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** शहरातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच सात नवीन आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित होणार आहेत. याकेंद्रांचा लाभ तापडिया नगर, रजपूतपुरा, जुना आय. टी. ओ. रोड, शिवणी खदान, आंबेडकर नगर, भारत नगर आणि भगतवाडी या भागातील हजारो नागरिकांना मिळणार आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते निलेश देव यांनी दिली.स्व. अँड. धनश्री देव यांच्या संकल्पनेतून २०१८ मध्ये मंजूर झालेल्या आरोग्यविषयक योजनांना आता गती मिळत आहे. त्या वेळी स्थायी समितीने आरोग्य सुविधा वाढवण्यासंदर्भात ठराव क्र. ९ मंजूर केला होता. आता महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांच्या प्रयत्नांमुळे या योजनांचे प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे. आयुष्मान आरोग्य केंद्र आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू होणार ! न्यु तापडिया नगर साठी अकोला महानगरपालिका प्रभाग ३ मधील पंचशील नगर, खरप, तापडिया नगर, निर्मल नगर, पोलीस वसाहत आणि पवन नगर या भागातील सुमारे आरोग्यवर्धिनी केंद्र २५,००० लोकसंख्येसाठी सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या भागात मुलभूत आरोग्य सुविधा अपुऱ्या असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. तसेच सततच्या पावसामुळे साथीचे आजार वाढले असून, महाराष्ट्र शासनाच्या विविध आरोग्य तपासणी मोहिमांसोबतच या केंद्राची गरज निर्माण झाली आहे.

अकोला शहरातील आरोग्य व्यवस्थेच्या सुदृढीकरणासाठी 'आरोग्य यंत्रणा आपल्या दारी' अभियान हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत दर महिन्याच्या चौथ्या रविवारी शहरातील प्रत्येक मोहल्लयात आरोग्य शिबिरे आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## श्री राम उत्सव समिती रामनवमीत राम भक्तांना वितरीत करणार एक लक्ष रामरक्षा सूत्र

### राम नवमीच्या महाआरतीत माजी खा. नवनीत राणा यांची राहणार उपस्थिती




**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** स्थानीय गांधी चौक परिसरात अनेक वर्षापासून रामनवमीचे राम दरबार व सांस्कृतिक उपक्रम साकार करणाऱ्या श्री राम उत्सव समितीच्या वतीने आगामी राम नवमीच्या पाँच दिवसीय उत्सवात रामभक्तांना एल लक्ष एकशे एक राम रक्षा सूत्र वितरित करून विविध उपक्रमाच्या माध्यमातून ही नवमी साजरी करण्यात येणार असल्याची माहिती राम उत्सव समितीच्या वतीने सोमवारी श्री रामदेवबाबा श्री श्यामबाबा मंदिर परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. आगामी दिनांक ६ एप्रिल रोजी येत असलेल्या श्रीराम नवमीत अनेक उपक्रम साकारण्यात येणार आहेत.यात गांधी चौक येथील चौपाटी परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून यावर्षी आकर्षक असा श्री राम दरबार साकार करण्यात येणार आहे.उत्सव हे दि २ एप्रिल ते ६ एप्रिल पर्यंत होणार असून याचा प्रारंभ २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता गांधी चौक येथे राम दरबार स्थापन व पूजन सोहळ्याने होणार आहे. दि ३ ते ५ एप्रिल दरम्यान श्री राम उत्सव मातृशक्ति समितीच्या वतीने अनेक सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम,स्पर्धा, बालकांसाठी अमर शहीद गणवेष स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून शहरातील मातृशक्तीच्या विविध मंडळांच्या वतीने नित्य दैनिक आरती होणार आहे.५ अप्रेल रोजी बालकांसाठी देशा करीता सर्वोच्च बलिदान करणारे अमर शहीदांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात येणार असून यात उत्कृष्ट वेशभूषा धारण करणाऱ्या बालकांना आकर्षक पुरस्कार बहाल करण्यात येणार आहेत.

## राज्याचा आर्थिक बजेट लाडक्या बहिणींचा हिरमोड करणारा

### आ.साजिद खान पठाण यांची प्रतिपादन



**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री ना. अजित पवार यांनी सन २०२५ - २६ चा आर्थिक बजेट सादर केला. या आर्थिक बजेटमध्ये लाडक्या बहीण योजनेचा उल्लेख सुद्धा न झाल्याने राज्यातील लाडक्या बहिणींच्या अपेक्षा भंग करणारा असा हा बजेट सादर झाला असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आ. साजिद खान यांनी दिली. पुढे बोलताना आ. पठाण म्हणाले की, सोमवारी सादर करण्यात आलेला बजेट हा बेरोजगार, शेतकरी वर्ग, लाडक्या बहिणी व सर्वच घटकांचा हिरमोड करणारा असा आहे. निवडणुकीपूर्वी राज्यात मोठ्या थाटात लाडकी बहीण योजना सुरू करून महायुतीने मते तर आकर्षित केली. तसेच सत्तेत आल्यावर लाडक्या बहिणींना मिळणारा लाभ हा १५०० वरून २१०० रुपये करण्यात येणार असल्याची पोकळ घोषणा सुद्धा फडणवीस सरकारने केली होती तर तशी तरतूद आगामी अधिवेशनात बजेट मध्ये करण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सोमवारी वित्तमंत्री ना. अजित पवार यांनी सादर केलेले बजेट मध्ये लाडक्या बहिणींचा उल्लेख सुद्धा करण्यात आला नाही. एकंदरीतहा बजेट समाजातील सर्वच घटकांचा अनादर करणारा असा आहे. निवडणुकीत गुलाबी रंगाचे जॅकेट घालून प्रचार करणाऱ्या ना. अजित पवार यांच्या जॅकेटचा रंग या बजेट ने पिवळा करून टाकला असल्याची खोचक प्रतिक्रिया यावेळी आ. पठाण यांनी केली.

## शहर स्वच्छतेकडे कायम दुर्लक्ष

**अकोला :** शहरातील अनेक आरोग्य भागात मुख्य रस्त्याच्या बाजूला अनेक ठिकाणी कचरा साचला आहे. महानगरपालिकेच्या विभागाचे या प्रकाराकडे दुर्लक्ष होत आहे. शहरात स्वच्छता ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक परिसरात एक आरोग्य निरीक्षक व पंचेचाळीस सफाई कर्मचारी, एक जेसीबी व एका ट्रॅक्टरची व्यवस्था अनेक वर्षापासून केली आहे. या व्यवस्थेवर वर्षाला कोट्यवधी रुपयांचा खर्च प्रशासन करते. तरीही स्वच्छता का राहत नाही हा प्रश्न आहे.

## निधन वार्ता

### देवकाबाई संपतराव फोपसे



**अकोला** : श्री. देविदास सपंतराव फोपसे यांच्या मातोश्री देवकाबाई संपतराव फोपसे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी दिनांक ९ मार्च २०२५ रविवार रोजी राहत्या घरी वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दिनांक १० मार्च २०२५ सोमवार रोजी सकाळी ११.३० वाजता राहत्या घरून निघाली.

# अकोल्यात होळीच्या पर्वावर रंगणार भव्य कीर्तन महोत्सव

## संत तुकाराम महाराज बीज निमित्त देहू नंतर अकोल्यात आयोजन,जयत तयारी सुरू

**▪अकोला,दि १० (प्रतिनिधी):** स्थानिक गायत्री नगर, कौलखेड रोड, अकोला येथील गायत्री नगरच्या प्रांगणात मागील सात वर्षांपासून संत तुकाराम महाराज बीज निमित्त अकोल्याचा आयकॉन समजल्या जाणारा भव्य दिव्य कीर्तन महोत्सव याही वर्षी होळीच्या शुभ मुहूर्तावर म्हणजेच रविवार दिनांक १६ ते रविवार दिनांक २४ मार्च दरम्यान दररोज नऊ दिवस, आठ ते दहा या वेळात मोठ्या होळी न खेळता भक्तिमय वातावरणात रंगणार आहे. विशेष म्हणजे अकोल्या जिल्ह्यातीलच नव्हे तर जवळच्या जिल्ह्यातूनही वारकरी माळकरी भाविक या महोत्सवाची आवर्जून उत्सुकतेने वाट बघत असून या सोहळ्यात संत तुकाराम महाराजांचा विजय असो एकनाथ महाराजांची षष्ठी व तिथीनुसार शिवजयंती असा त्रिरत्न उत्सवाचा योग असतो.या शब्दात दररोज अखंड विना




सकाळी पाच ते सहा काकडा महिलांसाठी सकाळी ११ ते २ व दुपारी दोन ते चार गाथा पारायण सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ व रात्री आठ ते दहा दरम्यान महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची भव्य दिव्य हरिकीर्तने होणार आहेत दि. १६ मार्चला ह भ प सचिन महाराज पवार देहू, दि. १७ मार्चला ह भ प शिवाजी महाराज मानकर आळंदी, दि. १८ मार्चला नाना महाराज कदम नेकनूर जिल्हा बीड, दि. १९ मार्चला ह भ प गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष गाथा मंदिर देहू, दि. २० मार्चला ह भ प कृष्णा महाराज चवरे पंढरपूर, दि. २१ मार्चला ह भ प अशोक महाराज इलग शास्त्री शेवगाव अहिल्यानगर, दि. २२ मार्चला ह भ प अनिल महाराज पाटील बार्शी, दि. २३ मार्चला ह भ प ज्ञानेश्वर महाराज वाघ वारी भैरवगड व दिनांक २४ मार्चला सायंकाळी सहा ते सात या वेळा ह भ प तुकाराम महाराज सखारामपुरकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे, गायनाचार्य म्हणून ह भ प किशोर महाराज लढे, ह भ प गोरखनाथ गतीर, विठ्ठल महाराज भेंडे आळंदी तर मृदंगाचार्य म्हणून ह भ प विठ्ठल महाराज कावळे, ह भ प अमोल महाराज पेलमहाले, ह भ प ज्ञानेश्वर महाराज यादगिरे व टाळकरी मंडळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंडळ देगाव यांची साथ लाभणार आहे, तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा.

# देवाभाऊंचा बडगा...!

**स्टेटलाईन**
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

ज्याप्रकारे (अमानुष मारहाणीचे) फोटो आले आहेत, ज्या प्रकारे (संतोष देशमुखांची) ही हत्या झाली आहे, या हत्येमागे ज्याला (वाल्मीक कराड) मास्टरमाईंड ठरविण्यात आले आहे, तो मंत्र्यांचा इतका जवळचा आहे, तर मग त्या मंत्र्याने नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यायला हवा... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कठोर भूमिकेमुळेच धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा अखेर राजीनामा देणे भाग पडले.

संतोष देशमुख हत्याप्रकरणी तपासासाठी सीआयडी नेमल्यावर सरकारने त्यांना पूर्ण मोकळीक दिली होती. न्यायालयात आरोपपत्र दाखल होईपर्यंत त्यात काय आहे हे मुख्यमंत्र्यांनाही ठाऊक नव्हते. फॉरेन्सिक लॅबमधून आरोपींच्या मोबाईलमधून डिलीट केलेली माहिती तपास यंत्रणांनी शोधून काढली. संतोष देशमुख यांच्या अमानुष मारहाणीचे जे फोटो समाज माध्यमातून व्हायरल झालेत तेसुद्धा पोलिसांनीच अथक प्रयत्नांनी शोधून काढले... स्वतः मुख्यमंत्र्यांनीच एका मुलाखतीत हे सांगितले.

तीन महिन्यांपूर्वी म्हणजेच दि. ९ डिसेंबरला बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख याची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या झाली, तेव्हापासून धनंजय मुंडे व त्यांचे जिल्ह्यातील सहकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड हा सुद्धा फार उशिरा पोलिसांच्या हाती मिळाला.

कृष्णा अंधळे तर तीन महिने झाले तरी अजून फरारीच आहे. तो जिवंत तरी आहे का, अशीही शंका व्यक्त केली जात आहे. संतोष देशमुख हा गावातील लोकप्रिय सरपंच होता. दोन कोटींच्या खंडणी वसूल करण्याच्या कामात त्याचा अडथळा होत होता म्हणून वाल्मीक व त्याच्या टोळीने त्याचे अपहरण करून, त्याला निर्वस्त्र करून त्याचे हाल हाल करून ठार मारले. खंडणी वसूल करताना यापुढे कोणी आपल्याला आडवे जाण्याचे धाडस करू नये या हेतूने दहशत निर्माण करण्यासाठी संतोषची निर्घृण हत्या करण्यात आली.

वाल्मीक हा या टोळीचा आका म्हणून ओळखला जात होता, तर या आकाचा आका म्हणून सरकारमध्ये मंत्री असलेल्या धनंजय मुंडेंकडे बोट दाखवले गेले. संतोषच्या मारेकऱ्यांचे आश्रयदाते मंत्रिमंडळात बसले आहेत, असे उघड आरोप होत होते तरीही तब्बल ८० दिवस स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि धनंजय मुंडेही कशाची वाट पाहत होते?

गेले तीन महिने भाजपाचे आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके, नमीता मुंदडा, करुणा मुंडे, सुप्रिया सुळे, अंजली दमानिया, मनोज जरांगे असे अनेक दिग्गज संतोष देशमुखांच्या हत्येवरून माध्यमातून तोफा डागत होते. बीडमधील भयावह दहशतवादाच्या कहाण्या रोज प्रसिद्ध होत होत्या. बीड हत्या प्रकरणात जनमताचा आणि राजकीय दबाव रोज वाढत होता.

पोलिसांच्या बदल्या झाल्या, नवे पोलीस प्रमुख आले, सीआयडी व एसआयटी नेमली गेली. माध्यमांचा व लोकप्रतिनिधींचा रोख आकाचा आका म्हणजे धनंजय यांच्यावर होता, पण मुंडे राजीनामा देत नव्हते. त्यांचे बॉस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार त्यांच्याकडे राजीनामा मागत नव्हते आणि स्वतः देवेंद्र फडणवीस हे अजितदादा काय करणार याची वाट पाहत होते.

फडणवीस म्हणत होते, अजितदादा जी भूमिका घेतील ती मान्य आहे, मुंडे म्हणत होते - मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगतील ते मला मान्य आहे आणि अजितदादा म्हणत होते - हत्या प्रकरणात मुंडेंचा संबंध आहे असे कोणतेही पुरावे पुढे आलेले नाहीत... जर पुरावे नाहीत, न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रातही त्यांचे नाव नाही मग मुख्यमंत्र्यांनी त्यांना राजीनामा द्यायला का सांगितले? अति तिथे माती असा प्रकार मुंडे यांच्याबाबतीत घडला असेच म्हणावे लागेल.

मुंडे हे मंत्रीपदाचा राजीनामा देण्यासाठी संतोष देशमुखच्या अमानुष हत्येचे फोटो व्हायरल होण्याची वाट पाहत होते का? मुंडे यांना अजितदादांची सावली असे म्हटले जाते, या सावलीला वाचविण्यासाठी शेवटपर्यंत आटापिटा चालू होता, असेच चित्र महाराष्ट्राला दिसले. दि. ९ डिसेंबरला सरपंचाची हत्या झाली आणि ४ मार्चला मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हा वेळकाढूपणा होता की त्यांना वाचविण्याचा प्रयत्न झाला?

महायुतीच्या सरकारमधील एका कॅबिनेट मंत्र्याला चार महिन्यांत राजीनामा देण्याची पाळी येते हे मुख्यमंत्र्यांनाही वेदनादायी नाही का? न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यावर मुंडे यांना सरकारमध्ये कोणीही वाचवू शकले नाही. गुन्हेगारांचा आश्रयदाता अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र पाठवून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची कारवाई करावी लागेल, असा सज्जड इशारा देण्याची पाळी मुख्यमंत्र्यांवर का आली?

संतोष देशमुख याच्या हत्येनंतर जसे वातावरण तापू लागले तसे मुंडे व त्यांच्या टोळीचे काळे कारनामे उघडकीस येऊ लागले. मित्रपक्षांना बरोबर घेऊन सरकार चालवणे कसे अडचणीचे आहे, याचा अनुभव देवेंद्र फडणवीसांना येऊ लागला.

विधानसभेत सरकारला प्रचंड बहुमत आहे. २८८ पैकी २३५ आमदार महायुतीचे आहेत. भाजपाचे १३७ आमदार निवडून आले आहेत. पण काही मंत्र्यांच्या पराक्रमांमुळे सरकारची सतत बदनामी होते आहे, या सर्वांना सांभाळून, समतोल राखत आणि विरोधी पक्षांना अंगावर घेत देवेंद्र फडणवीस महायुती सरकारचा गाडा रेटत आहेत.

भाजपाचे दिवंगत नेते व ज्यांनी पक्षाची पाळेमुळे राज्यात रोवली ते गोपीनाथ मुंडे यांनी राजकारणातील गुन्हेगारीच्या विरोधात सातत्याने आवाज उठवला व त्यांच्या पुतण्याला याच आरोपाखाली मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला यापेक्षा दुर्दैव काय असू शकते? आपले चुलते गोपीनाथ मुंडे यांचे बोट धरून धनंजय यांनी राजकारणात प्रवेश केला. भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष झाले.

गोपीनाथ मुंडे लोकसभेवर निवडून गेल्यावर त्यांच्या मतदारसंघातून त्यांनी पंकजाला भाजपाची उमेदवारी दिली तेव्हापासून धनंजय काकांवर नाराज झाले. पंकजा दोन वेळा परळीतून आमदार झाल्या. गोपीनाथ मुंडेंची राजकीय वारस म्हणून पंकजा पुढे आल्यावर धनंजय यांनी २०१४ मध्ये थेट राष्ट्रवादी काँग्रेसचा रस्ता धरला. २०१९ मध्ये त्यांनी पंकजा यांचा पराभव केला व राष्ट्रवादीचे आमदार म्हणून विधानसभेत पोहोचले.

महाआघाडी सरकारमध्ये सामाजिक न्यायमंत्री झाले तेव्हापासून त्यांचे बीडमधील साम्राज्य वाढू लागले. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या बंडखोरीत ते अजितदादांबरोबर गेले आणि महायुती सरकारमध्ये कृषिमंत्री झाले.

२०२४ मध्ये पंकजा यांनी भाजपच्या उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवली पण पंकजा यांचा पराभव झाला. पंकजा विधान परिषदेवर आमदार झाल्या. धनंजय परळीतून २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत पुन्हा आमदार झाले व फडणवीस यांच्या सरकारमध्ये अन्न नागरीपुरवठा मंत्री झाले.

धनंजय हे जबर महत्त्वाकांक्षी आहेत. अजितदादांचे विश्वासू आहेत. देवेंद्र-अजितदादा यांच्या गाजलेल्या पहाटेच्या शपथविधीच्या वेळी ते दादांबरोबर होते. बीड जिल्ह्यावर एकहाती वर्चस्व निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. वाल्मीकच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यात दरारा निर्माण केला. दहशतीच्या जोरावर वाल्मीक आपले साम्राज्य विस्तारत होता. पालकमंत्री म्हणून धनंजय यांची कवच कुंडले वाल्मीकवर होती. वाल्मीकसमोर जिल्ह्यातील पोलीस-प्रशासन वाकत होते. जे आड येतील त्यांना कायमचा धडा शिकवला जात होता, त्यातूनच संतोष देशमुखची निर्घृण हत्या झाली.

कोणत्याही जिल्ह्यातील पोलीस - प्रशासन हे पालकमंत्री किंवा स्थानिक आमदाराच्या विरोधात कधी जात नाहीत. त्याचा पुरेपूर लाभ धनंजय यांच्या सहकाऱ्यांनी उठवला. गेले तीन महिने धनंजय यांच्या विरोधात राज्यभर प्रक्षोभ प्रकट होत असताना पंकजा स्वतः शांत होत्या. मात्र धनंजय यांनी राजीनामा दिल्यावर, देर आए, दुरुस्त आए, असे त्या म्हणाल्या.

पंकजा यांनी बीडमधील एका कार्यक्रमात म्हटले होते - धनंजय यांचे पान ज्याच्याशिवाय हलत नाही, तो म्हणजे वाल्मीक कराड. त्यावर गर्दीतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला होता. मग बीडमधील आकाला अटक झाल्यावरच मोठ्या आकाने लगेचच मंत्रीपदाचा राजीनामा द्यायला हवा होता. संतोष हा मराठा, तर धनंजय हे वंजारी. मराठा विरुद्ध ओबीसी असाही संघर्ष पेटविण्याचा काहींनी प्रयत्न केला पण सत्तेच्या जोरावर दहशत आणि दहशतीच्या जोरावर सत्ता प्राप्त करणाऱ्यांना देवाभाऊंचा बडगा महागात पडला.

मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर त्यांना कोणाचीही सहानुभूती मिळाली नाही. त्यांच्या समर्थनार्थ बीडमधेही कोणीही रस्त्यावर उतरले नाहीत. धनंजय मुंडे व नैतिकता यांचा संबंध काय, असा प्रश्न तर विचारला गेलाच, पण त्यांचे बॉस अजितदादाही त्यांना वाचवू शकले नाहीत.

■ ■ ■

# नापासांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तशी पूर्वीचीच सर्व वर्गात परीक्षा ही पद्धत योग्य होती. गुणवंत विद्यार्थी बरोबर गाळून पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवली जात होती. पुन्हा जुने तेच सोने हे सत्य शासनाच्या प्रत्ययास येत आहे.

----------

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल.

शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहमीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल.

विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल, असे म्हटले जाते. राज्याच्या रिकामटेकड्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे.

यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे.

आगाऊ प्रयोगशील महाराष्ट्र राज्यात २०१०-११ पासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यानुसार मूल्यमापनामध्ये ड श्रेणी मिळालेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता त्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जात होता. मात्र त्यातून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. तसेच विद्यार्थ्यांना वयानुरूप प्रवेश द्यायचा असल्याने त्यांना मागील वर्गातील अध्ययन कौशल्य अपेक्षित प्रमाणात मिळाली नसली तरी त्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा लागत होता. त्यातून मुलांच्या पुढील अध्ययनात अडथळा येत असे.

या पार्श्वभूमीवर आता इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तर आठवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा दुसऱ्या सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळवावे लागतील.

नव्या बदलामुळे विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी किमान अपेक्षित अध्ययन कौशल्य प्राप्त केले की नाही, याची खात्री करता येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्यासह पुढील शैक्षणिक आव्हाने आणि स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सरकारकडून नव्या निर्णयाचे समर्थन करताना सांगण्यात आले आहे, बघुया, किती प्रभाव दिसतो ते!

राज्य सरकारने या परीक्षांचे सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. या परीक्षा शाळास्तरावर घेतल्या जाणार आहेत. मात्र परीक्षांवेळी केंद्रस्तरीय भरारी पथके तयार करून शाळांना भेटी दिल्या जाणार आहेत.

त्यानुसार या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असल्याची काळजी घेतली जाणार आहे. सहावी ते आठवी इयत्तेच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांना पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणावेसे वाटते, की एक ना धड; भाराभर चिंध्या!

-------------

संकलन व सुलेखन
कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गडचिरोली.
९४२३७१४८८३

■ ■ ■

# चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन!

९ मार्च २०२५ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी मिनी वर्ल्डकप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर चार गडी राखून विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास घडवला.

यावेळची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई या देशात खेळली गेली. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला चॅम्पियन करायचेच अशी खूणगाठ कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती.

विश्व कसोटी चॅम्पियन स्पर्धेत भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहाचवण्यास आलेले अपयश आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पराभव विसरून त्यांनी नव्याने सुरुवात केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार रोहित शर्माच्या मनात होता. त्याने निवड समितीकडून त्याला हवे ते खेळाडू घेतले.

दुबईतील खेळपट्टी फिरकीला अनुकूल असल्याने त्याने पाच फिरकी गोलंदाजांना संघात घेतले त्यातील रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या चार फिरकी गोलंदाजांना त्याने अंतिम अकरा मध्ये खेळवले आणि चारही फिरकी गोलंदाजांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत अप्रतिम कामगिरी केली. या चौघांना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, हार्दिक पांड्या आणि हर्षित राणा यांनी सुरेख साथ दिली. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला.

अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती चारही फिरकी गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले. भारताने न्युझीलंड संघाला अवघ्या २५१ धावात रोखले.

न्युझीलंड संघाने डावाची सुरुवात तर धमाकेदार केली पण रचीन रवींद्र आणि केन विल्यम्सन हे त्यांचे भरावशाचे फलंदाज बाद झाल्यावर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फास आवळला आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांना वेसण घातली त्याचा परिणाम असा झाला की त्रिशतकी मजल मारणारा न्युझीलंडचा संघ २५१ धावाच करू शकला.

न्युझीलंड संघाला २५१ धावांवर रोखून भारताने अर्धी लढाई जिंकली. केवळ गोलंदाजांनीच नव्हे तर फलंदाजांनीही छान कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने ७४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आणि शुभमन गीलने शतकी सलामी देऊन विजयाचा पाया रचला.

रोहित शर्मा हाच अंतिम सामन्याचा मानकरी ठरला. विराट कोहली स्वस्तात बाद झाला तरी श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी भारताला विजयी केले. अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारताच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली.

या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विजेतेपद मिळवले. रोहित शर्माने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला.

भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद आहे. २००२ साली भारताने श्रीलंके सोबत संयुक्त विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार सौरभ गांगुली हा होता . त्यानंतर २०१३ साली महेंद्रसिंग धोनी कर्णधार असताना भारताने इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती त्यानंतर बारा वर्षानंतर भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे.

तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून भारताने आम्हीच चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली हुकूमत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग तीन स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला दोनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

मात्र त्यानंतर मागील वर्षी टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले होते आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवणाऱ्या चॅम्पियन्स भारतीय संघाचे हार्दिक अभिनंदन!

■ ■ ■

## महासागर वृत्तपत्राद्वारे मिळाली वाडीची माहिती

पंधराशेची वाडी दिड लाख झाली... हा लेख दैनिक महासागर वृत्तपत्रात शुक्रवार ७ मार्च व शनिवार ८ मार्च रोजी प्रकाशीत झाला. मी ३५ वर्षापासून वाडीत राहत आहे. परंतु आजपर्यंत वाडीचा इतिहास माहीत नव्हता. तो संपूर्ण इतिहास महासागरद्वारा पूर्ण माहीत झाला. दीड लाख लोकसंख्येच्या वाढत्या शहरातील समस्या, अपूर्ण कामे आणि सुविधांचा अभाव या प्रश्नांना अरुण कराळे या एकमेव धाडसी पत्रकारांनी हात घालून समाजापुढे मांडले, हे अभिनंदनीय आहे.



जिथे स्थानिक नेते आणि इतर पत्रकार दुर्लक्ष करतात, तिथे आपण निर्भीडपणे हा मुद्दा उचलला. आपल्या या कार्याचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि हा उपक्रम सतत चालू राहील, तसेच आपल्या लेखणीतून स्थानिक नागरिक जागृत होतील, इतर पत्रकार, वार्ताहर यांना प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा आणि महासागरचे अभिनंदन!

■ चंद्रशेखर देशभ्रतार, वाडी, नागपूर.

**वाचक लिहितात**

## अग्निहोत्राचे महत्त्व!

दरवर्षी १२ मार्चला विश्व अग्निहोत्र दिवस साजरा केला जातो. त्यानिमित्ताने अग्निहोत्र करण्याचे महत्त्व आणि लाभ थोडक्यात जाणून घेऊ या.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्नीमध्ये आहुती अर्पण करून केली जाणारी सूर्योपासना म्हणजे अग्निहोत्र! ही उपासना करण्यासाठी वेळ सोडली, तर अन्य कशाचेच बंधन नाही.

अग्निहोत्रासाठी पिरॅमिडच्या आकाराच्या पात्रात गायीच्या शेणाच्या गोवऱ्या, दोन चिमूट अखंड तांदूळ आणि देशी गाईचे तूप यांच्या सहाय्याने अग्नी प्रज्वलित करतात. त्यानंतर मंत्र म्हणून आहुती दिली जाते. अग्निहोत्रातून निर्माण होणारा अग्नी हा वायुमंडलात दीर्घकाळ राहतो आणि त्यामुळे आपल्या भोवती दहा फूट अंतरापर्यंत संरक्षक कवच निर्माण होते.

अग्निहोत्रामुळे वनस्पतींना वातावरणातून पोषण द्रव्य मिळतात. भस्माचा वापर शेतीत केल्याने अधिक सकस आणि स्वादिष्ट अन्नधान्य, फळे,फुले आणि भाजीपाला पिकतो. अग्निहोत्र दररोज केल्याने मुलांच्या मनावर उत्तम परिणाम होऊन त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. चिडचिडी, हट्टी मुले शांत आणि समंजस होतात. मुलांना एकाग्रतेने अभ्यास करण्यात मदत मिळते.

अग्निहोत्राचे असे अनेक लाभ आहेत. आज आपले जीवन अतिशय धावपळीचे आणि तणावग्रस्त झाले आहे.अशा परिस्थितीत मानव जातीच्या कल्याणासाठी ऋषीमुनींनी अग्निहोत्राचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. आपण श्रद्धापूर्वक तो अवलंबल्यास निश्चितच लाभ होईल!

■ डॉ. सौ. स्वाती देशमुख
नागपूर.

## तर समजून जा किडनी खराब झाली



बदललेली जीवनशैली, खानापिण्याच्या चुकीच्या सवई आणि टेन्शन यामुळे अनेकांना बीपी आणि डायबिटीजचा आजार असतो, सध्या आणखी एक आजार वेगानं वाढतो आहे तो म्हणजे किडनीशी संबंधित समस्या. तुमच्या किडनीमध्ये जर काही समस्या असेल तर ती लवकर तुमच्या लक्षात येत नाही, मात्र त्यानंतर ती गंभीर स्वरूप धारण करू शकतो. त्यामुळे किडनीच्या आजारांकडे विशेष लक्ष देणं गरजेचं असतं.

किडनी हा तुमच्या शरिराचा सर्वात महत्त्वाचा अवयव असतो, ज्याच्यामाध्यमातून शरीरातील घाण बाहेर टाकण्याचं आणि रक्त शुद्ध करण्याचं काम केलं जातं. मात्र जर तुमच्या किडनीमध्ये काही प्रॉब्लेम झाला तर तुमच्या शरीराच्या विशिष्ठ भागांमध्ये तीव्र वेदना होतात. जर किडनीमध्ये काही समस्या असेल तर तुमचं शरीर त्याबद्दल काही संकेत देते.

किडनीवर सूज आल्यास कमरेच्या जवळ वेदना होतात. किडनी जास्तच खराब असेल तर तुम्हाला शरीराच्या इतरही भागात वेदना होऊ शकतात. पोटामध्ये तीव्र वेदना होतात. जर तुमचं पोट खूप जास्त दुखत असेल तर त्याकडे चुकूनही दुर्लक्ष करू नका, ते तुमच्या किडनी फेल्यूअरचं देखील लक्षण असू शकतं.

मूतखड्याचा त्रास असेल तर चुकूनही त्याकडे दुर्लक्ष करू नका, यामुळे तुम्हाला भविष्यात किडनीसंबंधी काही समस्या निर्माण होऊ शकतात. किडनीमध्ये काही तरी समस्या निर्माण झाल्याचं लक्षण असू शकतं. त्यामुळे अशा स्थितीमध्ये वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

■ ■ ■

# 'होळी' सणाचे पावित्र्य राखा!

दुष्प्रवृत्ती आणि अयोग्य विचार यांची होळी करून सत्प्रवृत्ती जोपासण्याचा संकल्प करण्याचा सण म्हणजे होळी. भारतात स्थानपरत्वे हा सण साजरा करण्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न असल्याच्या पाहायला मिळतात. होळी साजरी करण्यामागील कथाही राज्यानुसार आणि चालीरीतीनुसार वेगवेगळ्या सांगितल्या जातात.

काही प्रदेशात होळीला अधिक महत्व दिले जाते, तर काही ठिकाणी होळीनंतर येणाऱ्या रंगपंचमीला. गेल्या काही वर्षांत शहरासारख्या ठिकाणी होळी सणामध्ये गैरप्रकारांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला पाहायला मिळतो ज्यामुळे या सणाचे पावित्र्य कुठेतरी कमी होऊ लागले आहे. होळीचे निमित्त करून आठवडाभर आधीपासूनच इमारतींच्या गच्चीवरुन, रेल्वे गाड्या, बसेसवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिक पिशव्या फेकून मारल्या जातात. यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन मुलींसह नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना लक्ष्य केले जाते.

नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त युवावर्गाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर महिलांच्या सन्मानार्थ स्टेटस आणि पोस्ट लावल्या होत्या तोच युवावर्ग आज होळीचे निमित्त साधून महिलांवर पाण्याने भरलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या फेकताना दिसत आहे.

आज आपण येणाऱ्या जाणाऱ्या महिलांवर ज्याप्रमाणे पाण्याच्या पिशव्या फेकून मारत आहोत, कुठेतरी आपल्या आईला, बहिणीला आणि प्रियजनांनाही अशा प्रकारच्या त्रासाचा सामना करावा लागत असेल याचा विचार ही मंडळी केव्हा करणार? दरवर्षी केवळ पाण्याने भरलेले फुगे आणि पिशव्या मारण्यामुळे कितीतरी अपघात घडतात, कितीतरी जणांना आपले डोळे गमवावे लागतात, तर कित्येकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. मागील ५-६ वर्षांपासून होळीच्या निमित्ताने फुग्यांना पर्याय म्हणून पातळ प्लास्टिक पिशव्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत. धूलिवंदनाच्या दिवशी दुपारीच या प्लास्टिक पिशव्यांचा खच रस्त्यावर साचलेला पाहायला मिळतो. हवेसोबत उडत जाऊन या पिशव्या नाल्यांत आणि गटारांत साचतात. २६ जुलै २००५ या दिवशी मुंबईत महाप्रलय आला होता ज्याला मुख्यत्वे कारणीभूत प्लास्टिक पिशव्याच होत्या.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

वर्षभर प्लास्टिक निर्मूलनासाठी प्रयत्न करणारे पालिका प्रशासन होळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर कायदेशीर कारवाई करताना कुठे दिसत नाही. होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाते. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात.

या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे.

होळीसारख्या पवित्र सणामध्ये शिरलेल्या गैरप्रकारामुळे या दिवसांत अनेक जण घराबाहेर पडणे टाळू लागले आहेत. सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो: मात्र होळीसारख्या पवित्र सणाला आलेले ओंगळवाणे स्वरूप पाहता आपणच आपल्या धर्माची अवहेलना करत आहोत हे हिंदू केव्हा जाणणार आहेत?

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### भक्ती ?

देव देवळात
चित्त खेटरात
मन गुंतलय
समधं संसारात ...

गळयात माळा
पोटात काळा
सांगा कसा पावेल
विठू सावळा ?..

करावी निष्काम भक्ती
स्मरावा श्रीपती
नश्वर संसार
धरु नये आसक्ती ..

# युवा मानस

फंडू एसएमएस

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके मेरे
पिछे पडा है, उसे कहा था दिल
चीर के देख ,
तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम से
ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज सा
निकलते रहिये।

## बँकींग क्षेत्रात रोजगाराची संधी

संधी मोलाची




'बँक ऑफ बडोदा'ने अप्रेंटिसशिप पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. या भरतीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया या १९ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. इच्छुक आणि पात्र असणारे उमेदवार बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर अर्ज करू शकतात. या बँकेत एकूण चार हजार प्रशिक्षणार्थी पदे भरण्यात येणार आहेत.

**शैक्षणिक पात्रता**

अर्ज करण्यासाठी उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून कोणत्याही प्रवाहात पदवी उत्तीर्ण केलेली असावी.

**वय मर्यादा**

उमेदवाराचे वय २० वर्षांपेक्षा कमी आणि २८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तथापि, राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार वयात सवलत दिली जाईल.

**अर्ज करण्यासाठी किती फी?**

या भरतीमध्ये सामान्य, ओबीसी आणि ईडबल्यूएस श्रेणीतील उमेदवारांना अर्ज फी म्हणून ८०० रुपये भरावे लागतील तर एससी, एसटी आणि महिला उमेदवारांसाठी हे शुल्क ६०० रुपये असेल. पीडबल्यूबीडी श्रेणीतील उमेदवारांना ४०० रुपये शुल्क जमा करावे लागेल. यासोबतच अर्ज शुल्कासह जीएसटी स्वतंत्रपणे भरावा लागेल.

युनियन बँक ऑफ इंडियामध्येही २६९१ अप्रेंटिसशिप पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. १९ फेब्रुवारी २०२५ अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या आणि बॅचलर पदवीधारक तरुणांसाठी ही संधी चांगली आहे. इच्छुक उमेदवार युनियन बँकेच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची शेवटची तारीख ५ मार्च २०२५ आहे.

**महाराष्ट्रात २९६ पदांसाठी भरती होणार**

देशभरात २६९१ पदांवर भरती केली जाईल. त्यात विविध राज्ये आणि प्रदेशांसाठी रिक्त पदे निश्चित करण्यात आली आहेत. आंध' प्रदेशात ५४९, अरुणाचल प्रदेशात १, आसाममध्ये १२, बिहारमध्ये २०, चंदीगडमध्ये १३, छत्तीसगडमध्ये १३, गोव्यात १९, गुजरातमध्ये १२५, हरियाणामध्ये ३३, हिमाचल प्रदेशात २, जम्मू-काश्मीरमध्ये ४, झारखंडमध्ये १७, कर्नाटकमध्ये २८, महाराष्ट्रात २९६, दिश्रश्रत ६९, ओडिशामध्ये ५३, पंजाबमध्ये ४८, राजस्थानमध्ये ४१, तामिळनाडूमध्ये १२२, तेलंगणामध्ये ३०४, उत्तराखंडमध्ये ९, उत्तर प्रदेशमध्ये ३६१ आणि पश्चिम बंगालमध्ये ७८ पदांवर भरती करण्यात येणार आहे.

### टिप्स अँड ट्रिक्स

## कार इन्शुरन्स प्रीमियम वाचवायचाय?




तुम्हाला कार इन्शुरन्सशी संबंधी माहिती असायला हवी. कारण कोणती माहिती तुम्हाला कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही. जुनी कार विकल्यानंतर नवीन कार घेणार असाल, तर खरेदी करताना विम्याच्या प्रीमियमवर पैसे कसे वाचवू शकता याची जाणीव ठेवली पाहिजे. नवीन कार खरेदी करताना विम्याच्या प्रीमियमवर पैसे वाचवण्यासाठी तुम्ही 'एनसीबी ट्रान्सफर'चा लाभ घेऊ शकता.

### माहीत असावे...

## 'एनसीबी ट्रान्सफर'म्हणजे काय?




कोणत्याही विमा पॉलिसीमध्ये 'एनसीबी' लिहिलेले दिसल्यास, याचा अर्थ क्लेम बोनस नाही. हा बोनस तुम्हाला देण्यात आला आहे कारण तुम्ही पॉलिसीची रक्कम भरली आहे, त्या वर्षी तुम्ही विमा कंपनीकडून कोणताही दावा घेतला नाही. क्लेम न घेतल्यास कंपनीने तुम्हाला 'नो क्लेम बोनस'चा लाभ दिला आहे जो पुढील वेळी प्रीमियम कमी करण्यात मदत करेल.

## आयफोनच्या चाहत्यांना झटका

टेक वर्ल्ड



आयफोन म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे; परंतु आयफोनच्या चाहत्यांना मोठा झटका बसला आहे. कारण आयफोन १६ ई लाँच झाल्यानंतर कंपनीने तीन लोकप्रिय आयफोन मॉडेल भारतातील स्टोअर मधून हटवली आहेत. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये नवीन आयफोन १६ मालिका लाँच केल्यानंतर ॲपलने अनेक आयफोन मॉडेलना बाजारात हटविले होते. यात आयफोन १५ प्रो, आयफोन १५ प्रो मॅक्स आणि आयफोन १३ चा समावेश होता. आता या तीन फोनशिवाय आणखी तीन आयफोन भारतीय बाजारातून हद्दपार करणार आहेत.

**बंद झाले हे तीन मॉडेल्स**

आयफोन १६ ई २०२२ मध्ये लाँच केलेल्या आयफोन एसई ३ चे अपग्रेड मॉडेल्स म्हटले जात आहे. हा लेटेस्ट आयफोन कंपनीने एसई मॉडेलच्या तुलनेत मोठ्या अपडेटने मिळतो. यात प्रथमच फेस आयडीचा वापर केला गेलेला आहे. हा आयफोन लेटेस्ट १८ बीआयओएनआयसी चिप आणि इन हाऊस ५ जी मॉडेलसह बाजारात उपलब्ध आहे. ॲपल स्टोअरमधून २०२२ मध्ये लाँच झालेल्या आयफोन एसई ३ हटविले आहे. हा आईफोन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि अन्य रिटेल स्टोअरमध्ये केवळ स्टॉक संपेपर्यंतच मिळणार आहे.

२०२२ मध्ये लाँच झालेला आयफोन १४ आणि आयफोन १४ प्लस देखील अधिकृतरित्या ॲपल स्टोअर मधून हटविले आहे. ॲपलच्या ऑनलाईन स्टोअरवर दोन्ही मॉडेल आता विक्रीसाठी उपलब्ध नाहीत. परंतु युजर तरीही त्यांना ॲमेझॉन, फ्लिपकार्ट किंवा अन्य रिटेल स्टोरमधून स्टॉक उपलब्ध असे पर्यंत घेऊ शकणार आहेत.

## यूजीसीचा निकाल कसा तपासणार?

जाणून घ्या

यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल तपासण्यासाठी पुढील माहितीचा उपयोग होऊ शकेल. विशेष म्हणजे तुम्ही अगदी एका क्लिकवर यूजीसी नेट परीक्षेचा निकाल तपासू शकता. यासाठी फक्त पुढील प्रक्रिया जाणून घ्यावी लागेल.

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) लवकरच यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल जाहीर करू शकते. यासोबतच अंतिम उत्तरही जाहीर केले जाऊ शकते. या परीक्षेला बसलेले उमेदवार यूजीसी नेट डिसेंबर २०२४ परीक्षेचा निकाल युजीसीएनईटी.एनटीए.एसी.आयएन या अधिकृत वेबसाइटवर जाऊन निकाल पाहू शकतात. 'एनटीए'ने अद्याप अधिकृतरित्या निकाल जाहीर करण्याची तारीख जाहीर केलेली नाही; परंतु सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. याशिवाय उमेदवार थेट ही लिंक एचटीटीपीएस://यूजीसीएनईटी.एनटीए.एसी.आयएन/ तसेच अधिकृत वेबसाइटद्वारेदेखील आपला निकाल पाहू शकता. तसेच खाली दिलेल्या या स्टेप्सद्वारे निकाल पाहू शकता.

या वर्षी यूजीसी नेट परीक्षा तीन जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ दरम्यान देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर नऊ वेगवेगळ्या दिवशी आयोजित करण्यात आली होती. यापूर्वी ३१ जानेवारी २०२५ रोजी तात्पुरते उत्तर जाहीर करण्यात आले होते. उमेदवारांना तीन फेब्रुवारी २०२५ पर्यंत उत्तरपत्रिकेवर हरकती नोंदविण्याची संधी देण्यात आली होती. तात्पुरत्या उत्तर तालिकाच्या आधारे निकाल तयार केला जाईल. 'यूजीसी नेट'चा निकाल जाहीर झाल्यापासून ९० दिवसांपर्यंत नोंदी जतन केल्या जातील. पुनर्मूल्यांकन प्रक्रिया उपलब्ध होणार नाही.

**'यूजीसी नेट'चा डिसेंबर निकाल २०२४ कसा तपासावा?**

युजीसीएनईटी.एनटीए.एसी.आयएन च्या अधिकृत वेबसाइटवर जा. युजीसी एनईटी डिसेंबर निकाल २०२४ लिहिलेल्या लिंकवर क्लिक करा. आवश्यक तपशील प्रविष्ट करा. निकाल स्क्रीनवर दिसेल.

**पीएच. डी. प्रवेश गुणवत्ता यादी कशी तयार होते?**

नेट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या




उमेदवारांच्या नेट पर्सेंटाइलला ७० टक्के तर मुलाखतीला ३० टक्के वेटेज देण्यात येणार आहे. कॅटेगरी २ आणि कॅटेगरी ३ या दोन्हीतील नेट स्कोअर केवळ एका वर्षासाठी वैध असेल.

**'यूजीसी नेट'चा परीक्षा का घेतली जाते?**

ज्युनिअर रिसर्च फेलोशिप, असिस्टंट प्रोफेसर आणि पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) द्वारे 'यूजीसी नेट'ची परीक्षा घेतली जाते.

### स्मार्ट आयडिआज

## टच न करता पाहता येतील रील्स

इन्स्टग्रामवर रील स्क्रोल करताना अनेकदा हात थकतात. त्याचमुळे आता रील स्पर्श न करता बदलत येतील का, असा प्रश्न पडला असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. तुम्हाला आयफोन मध्ये एक छोटी सेटिंग करावी लागेल. यानंतर तुम्ही रीलांना स्पर्श न करता पाहू शकता. यासाठी फोनमधील सेटिंगमध्ये जा. येथे संपूर्ण सेटअप मिळेल. सेटअपसाठी खाली दिलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करा. थोडेसे स्क्रोल केले तर तुम्हाला ॲक्सेसिबिलिटीचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा.



ॲक्सेसिबिलिटी वर क्लिक केल्यानंतर सेटअप व्हॉईस कन्ट्रोल या पर्यायावर जा. येथे क्रिएट न्यू कमांड वर क्लिक करा. आता तुमच्या आवाजात नेक्स्ट म्हणा आणि रन कस्टम वर क्लिक करा. नवीन कमांडवर जा आणि इंस्टग्राम रील ज्या दिशेने ल होईल त्या दिशेने आपले बोट स्लाइड करा. यानंतर उजव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या सेव्ह ऑप्शनवर क्लिक करा. आता एन्स्टग्राम वर जा आणि त्याला स्पर्श न करता नेक्स्ट म्हणत रील पहा.

## 'गूगल पे'चे एक खास फिचर

टेक्नो टॉक




'गूगल पे'ने आपल्या यूजर्ससाठी पेमेंट करताना वापरता येईल असे 'एआय फीचर्स' सुरू केले आहे. आता 'गूगल पे'वर फक्त बोलून म्हणजेच व्हॉइस कमांडवर यूपीआय पेमेंट करता येणार आहे. या नव्या 'व्हॉइस फीचर'द्वारे डिजिटल पेमेंट करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. या फीचर्सबद्दलची संपूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. छोट्या-मोठ्या व्यवहारांसाठी 'यूपीआय'वर अवलंबून राहणाऱ्या सर्वांसाठी हे 'व्हॉइस कमांड अपडेट'चे फीचर महत्त्वाचे ठरणार आहे. 'गूगल पे'मध्ये व्हॉईस कमांडमुळे फार टेकसेव्ही नसणाऱ्या आणि तांत्रिकदृष्ट्या अशिक्षित असणाऱ्यांनाही ऑनलाइन पेमेंट करणे अधिक सोपे होणार आहे. कारण व्हॉस कमांडद्वारे व्यवहार हाताळता येणार आहेत. या फिचरला 'ट्रान्सफॉर्मेटिव्ह व्हॉईस' असे नाव देण्यात आले आहे. 'गूगल'ने स्थानिक भाषांमध्ये पेमेंट फॅसिलिटी सुलभ करण्याच्या उद्देशाने एआय प्रकल्पावर भारत सरकारबरोबर काम करत आहे. यासंदर्भातील करारही झाला आहे.

## फोनमधील फीचर करेल भूकंपाबाबत अॅलर्ट

गॅझेट वॉच

अलिकडेच दिल्लीमध्ये ४.० तीव्रतेचा भूकंप झाला. या पार्श्वभूमीवर भूकंप येण्यापूर्वी माहिती मिळाल्यास काय होईल? हे होऊ शकते आणि तेही तुमच्या अँड्रॉइड स्मार्टफोनद्वारे. मंडळी, अँड्रॉइडवरील एक फीचर भूकंपाच्या वेळी अलर्ट देते.

**भूकंप सूचना फीचर कसे वापरावे?**

फोनमध्ये भूकंपाचा इशारा मिळण्यासाठी एक फिचर इनेबल करावे लागेल. अर्थातच सूचना प्राप्त करण्यासाठी फोनमध्ये इंटरनेट कनेक्शन असणे आवश्यक आहे. याशिवाय भूकंपाचे इशारे देणारे ठिकाणही चालू करावे लागणार आहे.

**हे फीचर कसे सक्षम करावे?**

यासाठी प्रथम फोनमधील सेटिंग्ज उघडा. तेथे फोन सुरक्षा आणि आपत्कालीन स्थितीची माहिती देण्याच्या स्थितीत आणा. भूकंपाच्या सूचनांवर टॅप करा. भूकंपाचे अलर्ट चालू करणारा इशारा सुरू करा. येथे तुम्ही अलर्टचा डेमोदेखील तपासू शकता.

**कसे कार्य करते?**

अँड्रॉइडचे भूकंप अलर्ट वैशिष्ट्य अनेक गोष्टी करते. अँड्रॉइड फोनमध्ये एक्सीलरोमीटर आणि जायरोस्कोपसारखे सेन्सर असतात, जे जमिनीची कंपन मोजण्यात मदत करतात. भूकंपाचे हलके धक्के या सेन्सर्सद्वारे जाणवतात, तेव्हा स्मार्टफोन ती माहिती गुगल ए च्या सिस्टमला पाठवतो. क्लाउड-आधारित डेटा प्रोसेसिंग गुगल ची प्रणाली या डेटावर त्वरित प्रक्रिया करते आणि भूकंपाच्या आकाराचा आणि स्थानाचा अंदाज लावते. यानंतर यूजर्सना अलर्ट पाठवला जातो.




**स्मार्टफोन नेटवर्कचा वापर**

भूकंप आढळल्यानंतर, गुगल चे सेवा नेटवर्क वापरून अँड्रॉइड फोनद्वारे स्थानिक वापरकर्त्यांपर्यंत हा इशारा त्वरित पोहोचते. 'गूगल'च्या म्हणण्यानुसार भूकंपाचा इशारा देणारी यंत्रणा अतिशय अचूक आहे. हे लहान भूकंप देखील शोधू शकते; मात्र 'गूगल'च्या या फीचरवर अनेकवेळा प्रश्न उपस्थित झाले आहेत. भारतात हे फीचर अँड्रॉइड यूजर्ससाठी लाइव्ह आहे.

## रॉकींग लूक

फॅशन पॅशन



दोस्तांनो, काही वर्षांपूर्वीपर्यंत मुलांच्या वॉर्डरोबमध्ये एखादाच प्रिंटेड शर्ट असायचा. कॅज्युअल प्रसंगी तो कॅरी केला जायचा. पण आता फॅशनविश्व पूर्णपणे बदलून गेलं आहे. प्रिंटेड शर्ट मुख्य प्रवाहात आले आहेत. प्रिंट्समुळे सर्वसाधारण पेहरावालाही वेगळा लूक येतो. मात्र त्यावर योग्य बॉटम कॅरी करायला हवी. प्रिंटेड शर्टवर कोणती पँट घालायला हवी याबाबत...

* शर्टवरील प्रत्येक प्रिंट लक्षवेधी असायला हवी असं नाही. 'पेसली', 'गिंगम' किंवा 'पोलका डॉट्स' या प्रिंट्स तुम्हाला क्लासिक लूक मिळवून देतील. प्रिंटेड शर्टमुळे जीन्स आणि स्नीकर्समधल्या साध्या लूकलाही वेगळीच झळाळी येईल. पहिल्यांदाच प्रिंट्स घालणार असाल तर कलर कॉम्बिनेशनकडे लक्ष द्या. मिनिमल प्रिंटपासून सुरूवात करा. 'हवाईयन प्रिंट्स' फक्त फिरायला जाताना घालण्यापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. हा प्रकार तुम्ही वर्षभर कॅरी करू शकता. मोठ्या ब्रँड्सनी ब्लॅक, फॉरेस्ट ग्रीन, मातकट अशा रंगांमध्ये हवाईयन प्रिंटेड शर्टस आणले आहेत. या रंगाचे शर्टस खूप ट्रेंडी दिसतात. हे शर्ट चिनोज किंवा जीन्सवर घालता येतील.

* 'फ्लोरल प्रिंट' हा प्रकारही चांगलाच हिट आहे. रग्ड डेनिम किंवा शॉर्टसवर फ्लोरल प्रिंटवाले शर्ट घालता येतील. गडद रंगाच्या सूटवरही ते शोभून दिसतील. ब्लॅक जीन्सवर फ्लोरल शर्ट घालणं सर्वात सोपी फॅशन आहे.

* 'ॲनिमल प्रिंट्स' मुळातच खूप भडक असतात. त्यामुळे बॉटम्स थोड्या सौम्य असाव्या. चिनोज, डेनिम्स किंवा ब्लेझरवर या प्रिंट्सचे शर्ट घाला.

## हिरव्या वाटेवर

भटकंती



कॉलेजच्या परीक्षा संपल्यावर भटकंतीला सुरूवात होते. या दिवसात बाईकवरून फिरायची संधी असते. भरपूर वेळ असल्याने निसर्गाचा आस्वाद घेत, वळणावळणाच्या रस्त्यावरून अगदी आरामात जाता येतं. बाईकवरून जायचं तर हटके ठिकाणं हवी. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून जाण्याची मजा वेगळीच. यासाठी फार लांब जायची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रात अत्यंत सुंदर आणि रमणीय ठिकाणं आहेत. अशाच सुंदर ठिकाणापैकी एक म्हणजे ताम्हिणी घाट. हा घाट पुण्याला कोकणाशी जोडतो. या घाटातून जाण्याची खरी मजा पावसाळ्यातच येत असली तरी उन्हाळ्यातही तुम्ही या भागाची सैर करू शकता.

ताम्हिणी ते मुळशीदरम्यानचा हा घाट निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरतो. ताम्हिणीतलं थंड हवेचं ठिकाण खूप प्रसिद्ध आहे. वीकेंडसाठी तर हा घाट बेस्टच. या परिसरात बघण्यासारखं खूप काही आहे. तळी, घनदाट झाडी हे दृश्य मनोहारी दिसतं. मुळशी धरण पाहिल्याशिवाय इथला प्रवास पूर्णच होत नाही. इथे तुम्ही रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटू शकता. इथून जवळच कोलाड नावाचं ठिकाण आहे.

कुंडलिक नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरून इथे जाता येतं. वंजाई देवीचं मंदिरही पर्यटकांना आकर्षित करतं. इथे आल्यावर सिंहगडाला भेट द्यायला विसरू नका. ताम्हणी घाटाच्या बाईक टूर्सही असतात. इंटरनेटवर याची माहिती मिळू शकेल. मग काय दोस्तांनो, ताम्हिणी घाटाच्या मस्त सफरीला सज्ज व्हा.

## पान १ वरून...

### घोषणांचा पाऊस...

१०. सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८१०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

११. नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

१२. राज्यात सध्या राबवण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधन संपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचवण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

१३. थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.

१४. राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.

१५. राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

१६. क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१७. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.

१८. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

१९. राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला 5 किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

२०. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्याकरीता शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रति पूर्ती करण्यात येणार आहे.

२१. कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

### सर्वात बोगस बजेट...

टीका केली . आजच्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेसाठी काहीही नाही. पण कंत्राटदारांसाठी खूपकाही आहे. मुंबईमध्ये 64 हजार 783 कोटींची कामे होणार आहेत. ही कामे सामान्यांची नव्हे तर कंत्राटदारांच्या विकासाची आहेत. सरकारने दोन विमानतळे मेट्रोने जोडण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम अदानीचे आहे. कारण, विमानतळ अदानींना दिले असेल तर ते काम सरकारने नव्हे तर अदानींनी केले पाहिजे. हे सरकार अदानींना विमानतळाची जागा दिल्यामुळे आम्ही त्यावर रनवेही बांधून देऊ असे म्हणण्यासही मागेपुढे पाहणार नाही. हे सरकार आपल्या मालकाच्या मित्राच्या हिताचे करत आहे. विकासाच्या नावाखाली महाराष्ट्र खड्डयात घालण्याचे काम करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

### तनिष्क शोरूमधून...

त्यांनी आतून शटर बंद केले आणि सुमारे २२ मिनिटे दोन्ही मजल्यांवर लूटमार केली. 'पोलिसांनी शोरूममधील दरोड्याचे फोटो व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये शेअर केले होते. बाबुरा छोटी पुलाजवळ बधरा पोलिस ठाण्याला ३ दुचाकींवर ६ संशयित दिसले. जेव्हा त्याने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्या गुंडांनी गोळीबार केला. पोलिसांनीही गोळीबार केला. यामध्ये दोन गुन्हेगारांच्या पायात गोळ्या लागल्या. पोलिसांनी त्याला पकडले. त्यांच्याकडून तनिष्क शोरूममधून लुटलेले २ पिस्तूल, १० काडतुसे आणि दागिन्यांसह २ मोठ्या बॅगा जप्त करण्यात आल्या. त्यांची नावे विशाल गुप्ता, रहिवासी सारण दिघवारा आणि कुणाल कुमार, रहिवासी सोनपूर सेमरा अशी आहेत.

### विरोधकांचे पायऱ्यावर...

बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आलेली नाही, लाडक्या बहिणींचा उल्लेख ही भाषणात नाही. एकीकडे लाडकी बहिण योजनेत वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र केले जात आहे दुसरीकडे निधी वाढवून दिला नाही यावरून तिजोरीत खडखडाट असल्याचे स्पष्ट आहे असे विधी मंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले.

### विश्वासघात करणारा...

कोणत्याही घटकाला काहीही मिळणार नाही. भाजप-युती सरकार महाराष्ट्राला कर्जबाजारी करून देशोधडीला लावत आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला. सपकाळ यांनी स्पष्ट केले की, आजच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीचा एक शब्दही नाही. मोफत वीज देण्याची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात वीज बिले वसूल केली जात आहेत. शेतकऱ्यांना आश्वासन दिलेले सन्मान निधी वाढवण्याचे नियोजनही सरकारने केलेले नाही. कृषी क्षेत्रामुळे विकास दर वाढला असला तरी सरकारने शेतमालाला योग्य भाव दिला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

महिलांसाठी महत्त्वाकांक्षी मानली जाणारी लाडकी बहीण योजना यामध्येही सरकारने मोठा विश्वासघात केल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. या योजनेतून १० लाख महिलांना वगळण्यात आले आहे. महिन्याला २१०० रुपये मिळण्याच्या अपेक्षेने बसलेल्या लाडक्या बहिणींना सरकारने निराश केले आहे, असे त्यांनी सांगितले. राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका करताना सपकाळ म्हणाले, महाराष्ट्रावर आठ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे आणि उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. महाभ्रष्ट महायुती सरकारने राज्याला आर्थिक संकटात टाकले आहे. औद्योगिक विकासाचा वेग मंदावला असून फक्त मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर आणि कोल्हापूर हेच जिल्हे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, तर उर्वरित महाराष्ट्र उपेक्षितच राहिल्याचेही त्यांनी नमूद केले.

समृद्धी महामार्ग आणि शक्तीपीठ महामार्गावरही सवाल

सरकारने शेतकऱ्यांचा विरोध असतानाही शक्तीपीठ महामार्गाचा अट्टाहास धरला आहे, यावर सपकाळ यांनी नाराजी व्यक्त केली. समृद्धी महामार्गाने कोणाची समृद्धी झाली हे सर्वांना माहीत आहे. सरकार पुन्हा त्याच लोकांच्या फायद्यासाठीच काम करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

सपकाळ यांनी सरकारला लक्ष्य करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा मुद्दाही उपस्थित केला. ₹शिवरायांचे स्मारक अद्यापही वास्तवात आलेले नाही, मात्र सरकार आग्र्यामध्ये स्मारक उभारण्याची तयारी करत आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा अपमान करणाऱ्यांवर कारवाई केली जात नाही, हे दुर्दैवी आहे, असे ते म्हणाले.

# तरुणाईवर नागपूर पोलिसांचा लाठीमार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**



चॅम्पीयन ट्रॉफीमध्ये अंतिम सामन्यात भारताच्या विजयाचे संकेत दिसत असताना आनंद साजरा करणाऱ्या तरूणांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. या घटनेची सर्वत्र चर्चा सुरू असून, पोलिसांनी अनावश्यक लाठीचार्ज केल्याचा आरोप केला जात आहे.

रविवारी चॅम्पीयन ट्रॉफीमधील अंतिम सामना भारत विरुद्ध न्यूझिलँड संघादरम्याने खेळल्या गेला. शेवटच्या षटकापर्यंत पोहचलेल्या या सामन्यात क्रिकेटप्रेमींची उत्सूकता शिगेला पोहचली होती. दोन्ही संघ तुल्यबळ असल्यामुळे कोण जिंकणार याबाबत क्रिकेट प्रेमींच्या मनात शंका होती.

क्रिकेट सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात भारतीय फलंदाजांनी बाजी मारुन सामना खेचून विजयश्री मिळवली. भारतीय क्रिकेट संघाने चँम्पीयन ट्रॉफी जिंकताच क्रिकेटवेडे तरुण-तरुणी नेहमीप्रमाणे लक्ष्मीभवन चौक आणि धरमपेठमध्ये पोहचले. रात्री १२ वाजेपर्यंत क्रिकेट प्रेमींनी अक्षरशः धिंगाणा घातला.

कुणी फटाके उडवायला लागले तर कुणी फुगे फोडून आनंद व्यक्त करीत होता. पाहता-पाहता चौकात जवळपास १ हजारापेक्षा जास्त तरुणाई गोळा झाली. त्यांनी आनंदोत्सव सुरु केला. मात्र, काही वेळातच तरुणाईने मर्यादा ओलांडून गोंधळ घातला.

काही तरुण-तरुणी बाईकवर लक्ष्मीभवन चौक आणि धरमपेठ चौकात पोहचल्या. काही वेळातच शेकडोंच्या संख्येने तरुण-तरुणी चौकात गोळा झाले. त्यांनी आनंद व्यक्त करण्यासाठी फटाके फोडण्यास सुरुवात केली. काहींनी कारच्या टफवर चढून नाचने सुरु केले तर काही चौकातच फेर धरुन नाचायला लागले. काहींनी फटाके पेटवले आणि हवेत फेकले. काही तरुणींच्या अंगावर पेटते फटाके पडले.

काही असामाजिक तत्वांनी फटाके पेटवून तरुणींच्या दिशेने फेकले. त्यामुळे धावपळ झाल्याने तणाव निर्माण झाला. माहिती मिळताच अंबाझरी आणि सीताबर्डी पोलीस पथकासह तेथे पोहोचले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. रात्री १ वाजता काही क्रिकेटप्रेमींना मात्र पोलिसांचे दंडुके खावे लागले. काही तरुणांना अंबाझरी पोलिसांनी ताब्यात घेतले.

> क्रिकेटप्रेमींनी उत्साहाच्या भरात फटाके उडवले. काहींनी पेटते फटाके तरुणींच्या दिशेने फेकले. त्यामुळे एकच धावपळ झाली आणि गोंधळ उडाला. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. काही तरुणांना ताब्यात घेऊन प्रतिबंधात्मक कारवाईसुद्धा केली आहे.
> **विवेक राऊत, ठाणेदार**
> अंबाझरी पोलीस स्टेशन.

# काँग्रेसच्या शहर अध्यक्षांच्या घरावर गोळीबार

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १० :**

चंद्रपूर जिल्ह्याच्या घुग्गूस येथे काँग्रेस शराध्यक्ष राजू रेड्डी यांच्या घरावर काही अज्ञातांनी गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. रविवारी रात्री ९ वाजेच्या दरम्यान दोन जणांनी घरावर गोळ्या झाडल्याची माहिती आहे. मात्र, गोळीबार करण्याचे कारण समजू शकले नाही.

घुग्घुस शहरात काँग्रेस शहराध्यक्ष राजु रेड्डी यांच्या घरावर हल्ला झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटळास्थळी जात पुढील कारवाई सुरू केली आहे. हल्ला झाला त्यावेळी रेड्डी घरी उपस्थित होते. गोळीबारानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**गॅलरीत सापडले काडतूस**

पोलिसांना रेड्डी यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरील गॅलरीत गोळीबारात वापरलेले काडतूस आढळून आले आहे.या भ्याड हल्ल्याची माहिती घुग्घुस मध्ये पसरताच राजु रेड्डी यांच्या समर्थकांची मोठी गर्दी त्यांच्या घराबाहेर जमली, ज्यामुळे वातावरण आणखी तापले. पोलिसांनी रेड्डी यांच्या घरा सभोवती तगडा पोलीस बंदोबस्त त्याला तैनात केला आहे. हा हल्ला एका सुनियोजित कटाचा भाग असल्याचे रेड्डी यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. पोलिस या प्रकरणाचा वेगवेगळ्या दिशेने करीत आहेत.

चंद्रपूर पोलिसांकडून आरोपींच्या शोधासाठी शहरातील सीसीटीव्ही रेकॉर्डिंग तपासले जात असून या घटनेमागे राजकीय की व्यावसायिक वाद आहे याविषयी तर्कवितर्क व्यक्त केले जात आहे.

# ३ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा सन्मान दिन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प आज विधिमंडळात सादर करण्यात आला. ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा केला जाणार अशी घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली.

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल अजित पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभारही मानले. शिवाय मराठी भाषेच्या संवर्धनासाठी उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरू करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

*भाव फुलांना पायी उधळून*
*आयुष्याचा कापूर जाळून*
*तुझे सारखे करीन पूजन*
*गीत तुझे मी आई गाईन शब्दोशब्दी अमृत ओतून*

अशा काव्य पंक्तीतून अर्थमंत्री अजित पवार यांनी मराठी भाषेचा गौरव करीत माय मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून दिल्याबद्दल पंतप्रधानांचे आभार मानले आहेत.

यापुढे दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, तर ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येईल, अशी घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी केली.



मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर या ठिकाणी अभिजात मराठी भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र तसेच अनुवाद अकादमी स्थापित करण्यात येणार आहे.

**उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषाविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मराठी भाषेच्या संशोधनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरु करण्यात येणार, अशी माहिती यावेळी अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

# जात वैधता पडताळणी प्रक्रियेला वेग

## प्रलंबित प्रकरणांचा लवकर निपटारा : संजय शिरसाट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**

राज्यातील जात पडताळणी प्रक्रियेला वेग देण्यासाठी शासनाकडून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात असून, वडिलांचे जात प्रमाणपत्र वैध असल्यास त्यांचा पाल्यही थेट जात वैधता प्रमाणपत्र मिळवू शकणार आहे, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधानपरिषदेत दिली. प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून, नव्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर ही प्रक्रिया आणखी वेगवान होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सदस्य प्रज्ञा सातव यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मंत्री शिरसाट यांनी सांगितले की, सध्या राज्यात ३६ जात पडताळणी समित्या कार्यरत आहेत. त्यापैकी ३० समित्यांच्या अध्यक्षपदी अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती महसूल विभागाकडून केली जाते, तर उर्वरित ६ समित्यांचे अध्यक्षपद समाजकल्याण विभागातील अतिरिक्त आयुक्त आणि मंत्रालयातील सहसचिव स्तरावरील अधिकारी सांभाळतात.

यापूर्वी काही समित्यांमध्ये रिक्त पदांमुळे अतिरिक्त जबाबदारी काही अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली होती. मात्र, आता २९ अपर जिल्हाधिकारी नियुक्त करण्यात आले असून, त्यापैकी १६ अधिकाऱ्यांनी कार्यभार स्वीकारला आहे. उर्वरित अधिकारी लवकरच रुजू होणार आहेत, असेही शिरसाट यांनी सांगितले.

जात पडताळणी प्रक्रियेत प्रलंबित प्रकरणे मोठ्या संख्येने आहेत. मात्र, त्यांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी नव्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसह अनेक उपाययोजना राबवण्यात येत आहेत. मंत्री शिरसाट म्हणाले, ₹पूर्वी एकाच अधिकाऱ्याकडे अनेक प्रकरणे असल्याने नागरिकांना विलंबाचा सामना करावा लागत असे. प्रत्येक प्रकरणात गृहचौकशी बंधनकारक नाही. जात पडताळणी समित्यांमध्ये सध्या ४०% पदे रिक्त असून, त्यांची लवकरच भरती केली जाईल, अस शिरसाठ म्हणाले.

सरकारने जात पडताळणी प्रक्रियेत आणखी सुलभता आणण्यासाठी वडिलांचे जात प्रमाणपत्र वैध असल्यास पाल्यालाही ते थेट वितरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अनेक नागरिकांची अनावश्यक धावपळ टळेल. जात पडताळणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# औद्योगिक क्षेत्रात मजुराचा खून

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १० :**

जिल्ह्यात खुनाचे सत्र पुन्हा सुरू झाले. आर्णी तालुक्यातील राणी धानोरा येथे खुनाच्या घटनेची शाई वाळत नाही तोच सोमवारी सकाळी यवतमाळच्या औद्योगिक क्षेत्रात मजुराचा खून करण्यात आला.

विनोद शिपलेकर (२५, रा. कोलाम पोड, लोहारा) असे मृताचे नाव आहे. तो एमआयडीसीमध्ये एका कंपनीत मजूर म्हणून काम करीत होता. अज्ञात मारेकऱ्यांनी धारदार शस्त्राने वार करुन विनोदचा खून केला.

घटनेची माहिती मिळताच लोहारा पोलीस ठाण्याच्या निरीक्षक यशोधरा मुनेश्वर व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविला. विनोदचा खून कोण व का केला याबाबत लोहारा औद्योगिक क्षेत्रात विविध चर्चा सुरू आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलीय अधिकारी दिनेश बैसाणे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. विनोदचे मारेकरी परिसरातीलच असावे अशी चर्चा असून, पोलीस त्या दृष्टीने तपास करत आहेत. या प्रकरणी तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

यवतमाळ शहरात गेल्या काही वर्षात खुनाच्या घटना सतत घडत आहेत. काही दिवसांत या घटना कमी झाल्या होत्या. मात्र गेल्या आठवडाभरात पुन्हा खुनाच्या दोन घटना घडल्याने भितीचे वातावरण आहे.

# महायुती सरकारने जनतेला फसवले

**नाना पटोले यांची टीका**



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**

महायुती सरकारने आज सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेसाठी कोणताही दिलासा नाही. निवडणुकीपूर्वी दिलेली एकही आश्वासनं सरकारने पूर्ण केली नाहीत. त्यामुळे महायुतीने जनतेला फसवल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी टीका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली आहे.

अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना नाना पटोले म्हणाले की, राज्याची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे. आर्थिक पाहणी अहवालातूनच राज्याच्या अधोगतीचे संकेत मिळाले होते आणि आजच्या अर्थसंकल्पातून सरकारने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

राज्यावर आधीच ८ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे आणि महसूली तूट आणि राजकोषीय तूट वाढली आहे. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत असल्याने राज्याचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

सरकार फक्त प्रसिद्धीसाठी मोठ्या घोषणा करत आहे, पण त्याची अंमलबजावणी नाही. निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजनेतून २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि अन्य सवलतींची मोठी आश्वासने सरकारने दिली होती. मात्र, अर्थसंकल्पात यापैकी कोणत्याही घोषणेची अंमलबजावणी नाही. त्यामुळे सरकारने निवडणुकीपूर्वी जनतेला गाजर दाखवून मते मिळवली आणि आता फसवणूक केली, असे पटोले म्हणाले.

महागाई आणि बेरोजगारी या ज्वलंत समस्यांवर सरकारने कोणतीही ठोस रणनीती आखलेली नाही. मुंबई, ठाणे आणि पुणे यांच्यापुरतेच प्रकल्प, तर विदर्भ आणि मराठवाड्यासाठी कोणतीही योजना नाही. ग्रामीण भागातील बेरोजगारांसाठी कोणतेही ठोस धोरण नाही, त्यामुळे हा अर्थसंकल्प फक्त दिखावा आहे, असे सांगत पटोले यांनी सरकारच्या विकासाच्या घोषणांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

२०४५ पर्यंत महाराष्ट्र विकसित होईल आणि २०३० पर्यंत सर्वांना घरे मिळतील, अशा पोकळ घोषणांचा सपाटा सुरू आहे. वास्तविक, यातील कोणत्याही गोष्टीसाठी आर्थिक तरतूद किंवा अंमलबजावणीसाठी स्पष्टता नाही. सरकारने विकासाच्या गप्पा मारण्यापेक्षा तातडीने रोजगार निर्मिती, शेतकरी कल्याण आणि महागाई कमी करण्यासाठी निर्णय घ्यावेत, राज्याच्या भविष्यासाठी आणि जनतेच्या हितासाठी कोणताही ठोस रोडमॅप नसलेला, दिशाहीन आणि दिशाभूल करणारा आहे अशी घणाघाती टीका नाना पटोले यांनी केली.

## लोकारोग्य

### : हॅलो डॉक्टर :

# अलोपेशिया आजार, कारणं आणि उपचार

हल्लीची जीवनशैली ही प्रचंड धकाधकीची आणि तितकीच ताणतणाव युक्त अशी बनलेली दिसतेय. याच ताणतणावाचा दुष्परिणाम हा मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. मधुमेह, उच्चरक्तदाब, किडनीचे, फुफ्फुसाचे असे नवनवीन आजार देखील उदभवताना दिसतात. याच तणावयुक्त जीवनशैलीचा परिणाम हा मोठ्या प्रमाणात केसांच्या आरोग्यावर देखील होतोय.

अकाली केसगळती आणि टक्कल पडणे अर्थात अलोपेशिया चा विकार त्यामुळेच बळावताना दिसतोय. हा अलोपेशिया आजार नेमका काय आहे? या आजाराची कारण काय आहेत? निदान नेमकं कस करायचं? आणि अलोपेशिया आजारावर उपचार काय आहेत? याच प्रश्नांची उकल करण्यासाठी त्वचा विकार तज्ज्ञ डॉ. विनोद शृंगारे यांच्याशी बातचीत.

**अलोपेशिया नेमका कोणता आजार आहे?**

○ मोठ्या प्रमाणात केसगळती होणे किंवा डोक्यावर केस गळती होऊन टक्कल पडणे यालाच वैद्यकीय परिभाषेत अलोपेशिया म्हणतात. अलोपेशियाचे वेगवेगळे प्रकार आहेत. काही प्रकारामध्ये डोक्यावरच्या एकाच भागाचे केस गळू शकतात. तर काही प्रकारामुळे डोक्याच्या, चेहऱ्याच्या किंवा शरीराच्या अनेक भागातून केस गळती होते.

**अलोपेशिया हा आजार कशामुळे होतो?**

○ अलोपेशिया या आजाराची अनेक कारण आहेत. यामध्ये एंड्रोजेनेटिक अलोपेशिया हे पुरुष आणि महिलाच्या केसगळतीचे कारण आहे जे अन्यवंशिक आहे. हे पालकांकडून वारशाने पुढल्या पिढीला मिळते. आपल्या शरीराला जबरदस्त धक्का बसला कि शरीरावरील केसांची वाढ तात्पुरती थांबते. शिवाय केस गळतात. याशिवाय दीर्घकाळापर्यंत ताप येणे, मानसिक ताणतणाव, अचानक वजन कमी होणे, शरीरावरील शस्त्रक्रिया, लोह किंवा जस्ताची कमतरता, कर्करोगाची औषधी, सोरायसिस, दाद सारख्या रोगांचे संक्रमण, केसाना वापरले जाणारे रासायनिक साबण किंवा शाम्पू अशा अनेक कारणामुळे हा आजार होऊ शकतो.



**अलोपेशिया आजाराची लक्षण काय?**

○ अलोपेशिया एरिता मुळे केस गळण्याचे एक किंवा अधिक ठिपके डोक्यावर येतात. डोक्यावर जिथे टक्कल पडते तिथली त्वचा गुळगुळीत दिसते. काही लोकांना टक्कल पडलेल्या भागात खाज सुटते. जळजळ जाणवते. अलोपेशिया टोटॅलिस मध्ये डोक्यावरचे सर्व केस गाळून पडतात. टक्कल पडलेल्या भागाची त्वचा लाल दिसते. आपण त्वचाविकार तज्ज्ञाकडे गेलो कि ते ठराविक प्रकारच्या टेस्ट करून अलोपेशिया चे निदान करतात.

**अलोपेशिया आजारावर उपचार कोणते आहेत?**

○ अलोपेशिया आजाराचा उपचार नेमक्या कारणावर अवलंबून असतो. जर अंतर्निरहित संसर्ग किंवा आरोग्यस्थिती बिघडलेली असेल तर त्यावर उपचार केल्याने केस गळती कमी होऊ शकते. अलोपेशिया अनुवांशिक असेल तर महिलांसाठी मिनोऑक्सिडील किंवा स्पायरोनोलॅकः टोन किंवा सायप्रोट्रॉन या अँड्रोजन गोळ्या आहेत. पुरुषांसाठी मिनोऑक्सिडील गोळ्या किंवा फिनस्ट्राईड या गोळ्यांचा उपचार आहे. काही विशिष्ट प्रकारची तेल आहेत जी डोक्यावर चोळण्यासाठी असतात .केसांचे रोपण हा देखील कृत्रिम उपचार आहे.

■ ■

## चिंचेचे औषधी गुणधर्म

कांचनाथ कुळातला चिंचवृक्ष हा मूळ आफ्रिकेतला असल्याचे म्हणतात. परंतु अतिप्राचिन काळापासून तो भारतीय भूमीत आहे. त्याला भारतीय वृक्ष मानण्यात येतं. आपल्याकडं हिरवी चिंच व लाल चिंच अशा दोन जाती आहेत. चिंचफळातला गर रोचक, दाहशामक व रक्तपित्तशामक असतो. लघवीच्या विकारावर चिंचेच्या टरफलांची राख देतात. फुले रक्तसंग्राहक आहेत. चिंचपन्हे पित्त व इतर ज्वरात होणा-या जुलाबावर देतात. मुरगळा, व्रण बरा होण्यासाठी त्यावर चिंचपाला ठेचून बांधतात. चिंचपाला सारक, रूचकर व रक्तदोषनाशक असतो. त्यात टार्टिरिक ॲसिड व क्षारादी औषधी गुणधर्म असतात. पाळीव जनावरांची पचनक्रिया बिघडली असता त्यास चिंचपाला व लिंबपाला मिश्रीत चारा खाऊ घालतात. गुरांची मान व पाय सुजीवर चिंचपाला व वारूळाची माती उकळत्या पाण्यात कढवून त्याचा लेप करतात.पोटात कळा येत असतील, पातळ जुलाब होत असतील तर भाताच्या पेजेत चिंचपाला वाटून ते मिश्रण औषधासारखे घ्यावे. त्याने अतिसार थांबतात, असे वैद्यराज सांगतात. पाल्याच्या रसात तुरटी उगाळून त्यात कापडाची पटटी भिजवून डोळ्यावर बांधल?यास नेत्रविकार बरा होतो. चिंचेच?या कोवळ्या पानांची चटणी व कोशिंबीर फारच रूचकर लागते. चटणीत चवीला गुळ, हिंग व तिखट किंवा हिरवी मिरची वाटून टाकतात.भोजनानंतर मुखशुध्दीसाठी चिंचोका वापरतात. भाजलेल्या चिंचोक्यात मीठ व लिंबयुक्त ओवा टाकतात. ही सुपारी पाचक असते. ■



# नेफ्रोप्लसतर्फे देशभरात मोफत आरोग्य तपासणी

आशियातील सर्वात मोठे डायलिसिस केअर नेटवर्क असलेल्या नेफ्रोप्लसने १३ मार्च २०२५ रोजी जागतिक किडनी दिनानिमित्त भारतातील २०+ शहरांमध्ये आणि निवडक आंतरराष्ट्रीय ठिकाणी मोठ्या प्रमाणात किडनी तपासणी मोहीम सुरू केली आहे.

तुमचे मूत्रपिंड ठीक आहेत का? लवकर ओळखा आणि मूत्रपिंडाचे आरोग्य सुरक्षित करा.. या थीमखाली ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. याचा उद्देश क्रॉनिक किडनी डिसीज रोखण्याबाबत जागरूकता निर्माण करणे आहे. ६ मार्च ते १८ मार्च २०२५ या कालावधीत दिल्ली, हैदराबाद, बेंगळुरू, मंगलोर, हल्द्वानी, रांची, जयपूर, विशाखापट्टणम, राजमुंद्री, देहरादून, नागपूर, वडोदरा, वाराणसी, गोरखपूर, पटना, लखनऊ, दरभंगा, मोतीहारी, सासाराम, जौनपूर, आझमगड, महबूबनगर, हिसार, पंचकुला यासह भारतातील विविध शहरांमध्ये आणि नेपाळ, फिलीपिन्स आणि उझबेकिस्तानमधील निवडक क्लिनिकमध्ये मोफत तपासणी शिबिरे आयोजित केली जातील.



हा उपक्रम मधुमेह, उच्च रक्तदाब आणि तंबाखूच्या वापरासारख्या अस्वास्थ्यकर जीवनशैलीच्या पयार्यांमुळे धोका असलेल्या व्यक्तींसाठी, सीकेडीची लवकर ओळख आणि प्रतिबंध करण्यावर लक्ष केंद्रित करतो. तपासणी व्यतिरिक्त, नेफ्रोप्लस तीन दिवसांच्या कार्यक्रमादरम्यान गोळा केलेल्या डेटाचा वापर करून एक व्यापक संशोधन अभ्यास आणि विश्लेषण करेल.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com